# प्रभात

१९८५२

म. ग्रं. सं. ठाणें.,

विषय काव्य

सं. क्र. 2383

REFBK-0022514

REFBK-0022514



रसगंगाधर

मानमीय न्याय० रा० के०
रानडे यांस
आदराने
— गं० वि० कुलकर्णी
कोल्हापूर.
दि. ३।५।५५

२३८३ काव्य
२२५१४
३०११७५
संदर्भ भेट

# प्र सा द

रसगंगाधर

REFBK-0022514
REFBK-0022514

प्रस्तावना : आचार्य स. ज. भागवत

सूर्यप्रकाशाचा । घेवोनि आश्रय ।
सतेज ती होय । दृष्टि जेव्हां ॥
तेव्हां अंधारातें । पुसे तेथें कोण ।
जाय तो लोपोन । स्वभावेंचि ॥
लाभोनि प्रसाद । माझा पार्था तैसा ।
भ्रांत जीवदशा । आटे जेव्हां ।
तेव्हां भवरूप । बागुलाचि भीति ।
कैसी कोणाप्रति । बाधूं शके ॥

—अभंगज्ञानेश्वरी

प्रकाशक :
प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी
२५७२ बी, खासबाग
कोल्हापूर २

मुद्रक :
गोविंद वामन कुलकर्णी
१६७ बी, वॉर्ड
कोल्हापूर.

© प्रा. गं. वि. कुलकर्णी

प्रकाशन :
तारीख २६-७-१९७२
गुरुपौर्णिमा

मूल्य : ५ रुपये

# स्वामी स्वरूपानंद



' सोऽहं मंत्रमहर्षे ! अमृताच्या कंदा ! '

ॐ

साक्षात् परब्रह्म

**प. पू. स्वामी स्वरूपानंद**

यांचे पवित्र चरणी

**स म र्प ण !**

# प्रस्तावना

प्रा. गं. वि. कुलकर्णी यांच्या कवितांचा हा दुसरा संग्रह 'जाग' या त्यांच्या पहिल्यावहिल्या काव्य-संग्रहानंतर जवळ जवळ १२ वर्षांनीं 'प्रसाद' हा नव्या कवितांचा संग्रह रसिकांपुढें येत आहे. कवि गिरीश, भाऊसाहेब खांडेकर, प्रा. गो. के. भट इत्यादि थोर काव्य-रसिकांनीं त्यांचें त्यावेळीं स्वागत केलें होतें. 'कवीच्या चिंतन-शील मनाची ओळख' कवितांमधून होते हा त्यांचा मुख्य अभिप्राय दिसतो. भाऊसाहेब खांडेकरांनीं म्हटल्याप्रमाणे 'चिंतन-शीलता उदात्ततेशी' संलग्न असते, 'जाग' मधील कवितांना उदात्ताचा स्पर्श झालेला आहे, कलात्मकतेपेक्षां जिव्हाळा हा प्रा. कुलकर्णी यांच्या कवितेचा विशेष आहे, हेंहि भाऊसाहेबांनीं नमूद करून ठेविले आहे. एक तपाचा कालावधि लोटल्यानंतर प्रकाशांत येणाऱ्या 'प्रसादा'तील कवितांमध्ये कवि-मनाचे हेच विशेष स्थिर आणि परिणत झालेले आढळतील. 'जाग' मधील अखेरच्या कवितांतील 'अरुणाचला!' ही कविता प्रस्तुत संग्रहांत प्रारंभीं पुन्हां घेतलेली आहे यावरूनहि कवीच्या चिंतनविषयाचें सातत्य अखंड राहिलेलें स्पष्ट होतें. कवीचें काव्य त्याच्या जीवनांतील अनुभूतींशीं तादात्म्य राखून चाललें आहे हें स्पष्ट समजतें. कवीची बैठक अधिकाधिक स्थिर होत चाललेली दिसते. स्थैर्यांतून स्वाभाविकच प्रसन्नता जन्म पावते. ही प्रसन्नवृत्ति या संग्रहाचें प्रमुख वैशिष्ट्य मानावें लागेल.

या संग्रहांत अनुवादात्मक कविता मोठ्या प्रमाणांत आढळतात. १४४ पृष्ठांपैकी ८२ पृष्ठें अनुवादांची आहेत. २१ अभंगांची एक अभंगांजलि आहे. मेहेरबाबा, गौतमबुद्ध, ज्ञानेश्वर यांच्या दिव्यतेनें स्फुरलेली एक एक कविता आढळते. भगवान् रमण यांची एक आरतीहि आहे. आणि सुमारे

२५ स्फुट कविता आहेत. या सर्व रचनेंत अध्यात्माचें एक अखंड सूत्र ओंवलेलें आढळेल. काव्याच्या अभिव्यक्तीपेक्षां या आध्यात्मिक सूत्राचाच थोडा विचार या ठिकाणीं करावासा वाटतो.

जीव, जगत् आणि ईश्वर हे आध्यात्मिक चिंतनाचे सनातन विषय आहेत. भारतीय परंपरेंत वेदकालापासून अगदीं आजच्या क्षणापर्यंत भारतीय चिंतकांनीं यांचा सतत ध्यास धरला आहे. जीव, जगत् आणि ईश्वर यांचे परस्पर संबंध शोधण्यांत आणि त्यांचें विवरण करण्यांत भारतीय पुरुषांनीं आपला सारा पुरुषार्थ सामावून ठेविला आहे. द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत इत्यादि तत्त्वज्ञानाचे संप्रदाय आणि ज्ञान, कर्म, भक्ति आणि योग इत्यादि साधनांचे समुदाय यांचा जन्म यासाठींच झालेला आहे. अध्यात्म हा केवळ बौद्धिक चिंतनाचा विषय मानलेला नाहीं. तो एक साक्षात् अनुभूतीचा मार्ग आहे. आणि त्या अनुभूतींतून मोक्ष निर्माण होतो अशी भारतीयांची दृढ निष्ठा आहे. या निष्ठेमुळें भारतीय लोकांनीं अलिकडे आपल्या भौतिक जीवनाकडे दुर्लक्ष केलेलें दिसतें. तथापि भारताच्या प्राचीन इतिहासांत भौतिक जीवनाचाहि पुष्कळ विचार झालेला आहे आणि आधुनिक काळांत तर साऱ्याच भारतीय थोर विभूतींनीं भौतिक आणि आध्यात्मिक यांचा समन्वय करण्यांत आपली बुद्धि आणि शक्ति वाहिलेली आहे. आजच्या विज्ञान-युगांतहि जगांतील सर्व विचारवंतांपुढें हीच समस्या उभी ठाकलेली आढळते. यामुळें अध्यात्म-साधना ही केवळ व्यक्तिगत साधना न राहतां ती सामुदायिक साधना झाली पाहिजे हा विचार, स्थिर होऊं पाहात आहे. योगी अरविंदांच्या 'पूर्णयोगां'त या विचाराला चांगलें शास्त्रीय रूप देण्यांत आलेले आहे. गुरुदेव रवींद्रनाथ ठाकुर यांच्या विशाल साहित्यांत विज्ञान आणि आत्मज्ञान यांचा समान आदरानें उद्‌घोष केलेला सांपडेल.

आधुनिक विज्ञानामुळें जगांतील साऱ्या मानव-समूहाला एकत्र आणले आहे. देश, काल, यांची बंधनें प्रत्यक्ष व्यवहारांतच नष्ट झाली आहेत. त्यामुळें मानवाचा कोणताहि प्रश्न साऱ्या मानवजातीचा विचार करूनच सोडविला पाहिजे. विज्ञान-युगांत मानवाचें मन जर संकुचित राहिलें तर ते पदोपदीं

दुःख निर्माण करील. उपनिषदांत ऋषीनें म्हटलें आहे — 'यो वै भूमा तत् सुखम्, न अल्पे सुखम् अस्ति।' भूमा म्हणजे अनंत. जे अनंत आहे, तेंच खरें सुख आहे. अल्पांत सुख नसतें. आजच्या काळाला हा सिद्धांत सर्वस्वी लागू पडतो. कोणताहि प्रश्न घ्या. तो साऱ्या मानव-समाजाचा आहे असें समजून वागलें तरच त्याची सोडवणूक होईल. अज्ञानानें जर आपापल्या व्यक्तीचा, कुटुंबाचा वा लहानशा समुदायाचा विचार होत राहिला तर तो दुःखालाच कारण होईल. हें आज प्रत्येकाला समजलें पाहिजे. आणि नित्याचा सारा व्यवहार व्यापक जाणिवेनेंच चालविला पाहिजे. सारे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रश्न मानव-जातीचा विचार करूनच सोडवितां येतील. याचा अर्थ अध्यात्माचा स्वीकार करूनच विज्ञानाचा व्यवहार यशस्वी होईल. ही जाणीव प्रत्येक व्यक्तीमध्ये निर्माण करणें हें अध्यात्माचें कार्य आहे. प्रत्येक व्यक्तीच्या चित्तांत अनंताकडे जाण्याची प्रेरणा सुप्त रूपानें असतेच. शिक्षणानें आणि चिंतनानें ती जागृत करितां येते. विज्ञान-युगांतील शिक्षणांत अध्यात्माचा प्रवेश झाल्याशिवाय मनुष्याचें चित्त व्यापक बनणार नाहीं. लहानपणापासूनच पृथ्वीवरच्या सर्व बालकांना व्यापक वृत्तीनें जगण्याचें शिक्षण दिलें गेलें पाहिजे. माणसाच्या कोणत्याहि चित्तवृत्तींत व्यापकतेचा प्रवेश झाला म्हणजे ती नेहमींच कल्याणकारी बनते. इंद्रियांच्या कोंडींत चित्तवृत्ति अडकून पडण्याचा धोका असतो. इंद्रियें मारणें हा त्यावरचा उपाय नव्हे. इंद्रियांमधून बाहेर पडून बाह्य विश्वाच्या अनंततेचें दर्शन घेण्याची इंद्रियांना संवय लावली पाहिजे. निसर्गाचें प्रेम ज्या प्रमाणांत वाढत जाईल त्या प्रमाणांत इंद्रियांच्या शक्ती व्यापक होत जातात. दुसऱ्याचें दुःख निवारण्याची वृत्ति अशीच वाढवितां येते. यामधून चित्ताच्या मैत्री व करुणा या शक्ति विकसित होत जातात. दुसऱ्याच्या आनंदात आनंद घेण्याच्या वृत्तीला योगशास्त्रानें मुदिता हे नांव दिलें आहे. आपणांला बाह्य जगाकडून जेव्हां दुःख होईल तेव्हां हिंसा अथवा द्वेष या विनाशक वृत्तींच्या आहारीं न जातां चित्त शांत आणि स्थिर राखण्याला ज्या धैर्याची अपेक्षा असते त्याला योग-शास्त्रानें उपेक्षा असें नांव दिलें आहे. मैत्री, करुणा, मुदिता आणि उपेक्षा या वृत्ति जोपासण्याचें काम लहान वयांतच मुलांना शिकविलें पाहिजे. सृष्टीवर विजय मिळवून आपल्या अन्नवस्त्रादि गरजा

भागविण्याचें कौशल्य मिळवीत असतांनाच त्याच निसर्गावर प्रेम करण्याची शक्ति वाढत गेली पाहिजे हें नवें शिक्षण होय. या शिक्षणांत विज्ञान आणि आत्मज्ञान या दोहोंचाहि समन्वय साधला जाईल. या शिक्षणानें तयार झालेला नवा मानव या पृथ्वीवरच आनंदाचा नवा स्वर्ग निर्माण करील. साहित्यातून आणि कलांतून ही नवी जीवन-दृष्टि यापुढें उत्कटतेनें प्रकट झाली पाहिजे. माझी स्वतःची साहित्याकडे पाहाण्याची हीच दृष्टि आहे.

या माझ्या दृष्टीनें प्रा. कुलकर्णी यांच्या काव्याकडे पाहिल्यास मला बरेंच समाधान आढळलें. प्रा. कुलकर्णी यांनीं आपली जीवन–साधना शक्य तितकी व्यापक आणि अनाग्रही राखण्याचे प्रयत्न केलेले दिसतात. कोठल्याहि एका विशिष्ट संप्रदायाला त्यांनीं आपणाला जखडून ठेवलेले दिसत नाहीं. उदाहरणार्थ, त्यांच्या ' क्षण ' या कवितेंत ' सारी ' सुखदुःखें अंगावर कोसळत असतांनाहि आपलें चित्त त्या सुखदुःखात अधिक गुंतविलें नाहीं तर—

शेवटी शून्य उरते
क्षण क्षणांत भिजतो, विरतो
गोड गोड मिठी देतो
त्याची मिठी पकडायची नसते
शेवटी सारेच विसरायचे असते
सर्वं क्षणिकम् । सर्वं सुखम् ।

असा विचार आला आहे. हा विचार त्यांच्या स्वतःच्या अनुभूतीशीं जोडलेला असला पाहिजे. कारण यात वर्णिलेली क्रिया अनुभवाशिवाय सुचणार नाहीं. हा अनुभव फार मोलाचा म्हणता येईल. ' दुःख ' नांवाच्या कवितेंतहि त्यांनी, "दुःख मृत्यूच्या सावलीसारखे असतें, ते माणसाला एकाकी करतें, त्याला भाजून काढतें, खोल दरीत नेऊन पापाची बटबटीत फलितें दाखवितें, हे सर्व खरें. पण हें सर्व तटस्थतेनें पाहू शकणाराला —

...... आणि अचानक वर नेते
निळ्या डोंगराच्या शिखरावर
दिव्य मंदिराच्या महाद्वाराशी
स्वतः अदृश्य बनून." असे उद्गार काढिले आहेत.

'घर' या कवितेत 'घर हें मोक्षाचें माहेर आहे.' असें वर्णिलें आहे. पण हें बाहेरचें दगडा–मातीचें घर नव्हे. कारण–

घरांत गंगा, यमुना, सागर
घरांत अंबर, घरांत गिरिवर

असें अंतःकरणांतल्या खऱ्या घराचें स्वरूप वर्णिलें आहे. अशा बऱ्याच कविता वाचकाला आढळतील. कवि हा 'नव्या प्रकाशाचा नवा पाईक' होऊं इच्छितो. तसें होण्याची धडपड कवीच्या चित्तांत अखंड चाललेली दिसते. आजच्या समाजांत घरा घराला अवकळा येत असलेली दिसली तरी 'आजचा अंधार ही उद्यांच्या प्रकाशाची पहांट आहे' अशी श्रद्धा कवीनें व्यक्त केलेली आहे.

अनुवाद--कवितांमध्यें कबीर व रवीन्द्रनाथ यांच्या कवितांचे कांहीं अनुवाद आहेत. रवीन्द्रांच्या कवितांची निवड योग्य म्हणतां येईल. पण खरा कबीर गवसला नाहीं. कबीरांत अनुभूतीची मस्ती आहे. आणि साऱ्याच कर्मकांडाची रेवडी उडवलेली आहे. त्या कबीराचें दर्शन झालें असतें तर बरें झालें असतें. पण अनुवाद विभागामधली 'सैचीचीं मुक्ति–सूक्ते' हा विभाग अत्यंत सुंदर आहे. मराठी साहित्यांत बौद्ध धर्मातील साधनमार्ग कोठेंच आढळत नाहीं. इतकेंच काय पण खुद्द गौतम बुद्धांच्या विभूतिमत्त्वाचा मराठीच्या प्राचीन साहित्यांत उल्लेखहि आढळत नाहीं. जेव्हां कोठें उल्लेख येतो तेव्हां अवहेलना केलेली आढळते. आधुनिक साहित्यांतहि बुद्ध–गौरव विरळाच. अगदीं अलिकडे थोडा बदल होत आहे असें दिसतें. यामुळेंहि प्रा. कुलकर्णी यांना बहुत धन्यवाद दिले पाहिजेत. सामान्यतः संस्कृत पंडित वैदिक धर्माचे अभिमानी असतात. त्यांना अवैदिक पंथांविषयी अनादर वाटतो. अलिकडे धर्मानंद कोसांबीसारख्यांच्या प्रयत्नांमुळे बौद्ध आणि जैन धर्म वाङ्मयाचा अभ्यास सुरू झाला आहे व त्या पंथांचें ज्ञान नव्या सुशिक्षितांत पसरत आहे. यामुळें बौद्ध आणि जैन साहित्याकडे पाहण्याची दृष्टि निवळत चालली आहे. महात्मा गांधींच्या सर्व–धर्म–समभावनेच्या उदात्त कल्पनेचा प्रभावहि वाढत आहे. अशा परिस्थितीत प्रा. कुलकर्णी यांना औपनिषदिक साधनेबरोबरच बौद्ध पंथातील ध्यान–साधनेचा गौरव करावासा वाटला हे ठीकच झालें. सैची हा बौद्ध धर्मातील शिन पंथाचा साधु आहे. 'नमु–अमिद–बुत्सु' हा त्याचा

गूढ नाममंत्र आहे. ' नमः अपरिमिताय बुद्धाय ' हें त्याचें संस्कृत स्वरूप. तो ' सोऽहम् ' या वैदिक मंत्राशीं जुळणारा आहे. सोऽहम् या मंत्राच्या जपानें साधक आपल्या जीवात्म्याचें परब्रह्माशीं एकत्व साधण्याचा प्रयत्न करतो. त्याचप्रमाणें सैची आपल्या जीवात्म्याचे बुद्धाशीं एकरूपत्व साधण्याचा प्रयत्न करीत आहे. सैचीनें आपल्या या मुक्ति-सूक्तांत आपली सर्व साधना स्पष्ट केली आहे. ती वाचकांनीं काळजीपूर्वक वाचावी. त्याविषयी येथें अधिक विस्तार करण्याची गरज नाही.

नव्या युगाच्या निर्मितीला नवा मानव पाहिजे आहे. त्यासाठीं जुन्या युगांतल्या दोन भ्रमांतून बाहेर पडावे लागेल. विज्ञानाची परिणति अणुशक्ति निर्माणात झाली आहे. त्यामुळें युद्धावर आधारलेली सारी राजकारणें गतार्थ झालीं आहेत. आत्मज्ञानानें सर्व रूढ धर्म विफल केले आहेत. गांधीजींनी आणलेला सत्याग्रहाचा नवा विचार विनोबाजींनी स्वातंत्र्योत्तर काळांत अधिक परिणत केला आहे. त्यांनीं ' जय-जगत् ' हा नवा उद्घोष घुमविला आणि विज्ञान आणि आत्मज्ञान यांचें सहकार्य पुकारलें. या नव्या युगाच्या निर्मितीची स्वप्नें बाळगणारे कृष्णमूर्तीसारखें जीवनाचे नव विचारक जगभर पुढें आले पाहिजेत. नवबालकाच्या जन्मापूर्वी जन्म देणाऱ्या मातेला असह्य प्रसव-वेदनांतून जावे लागते. सध्यां चालू असलेल्या विश्व-गोंधळांत या प्रसव-वेदनांची चिन्हें आढळत आहेत. यांतूनच नव विश्वाचा जन्म होणार आहे. ही श्रद्धा आपल्या हृदयांत जागविणारे कलावंतहि पुढें येण्याची गरज आहे. ' प्रसाद ' कार यांतील एक अल्प पाईक ठरले तरी पुरे.

प्रा. कुलकर्णी यांच्या जीवन-साधनेंत गुरुकल्पनेला विशेष स्थान दिसतें. ' कोणताहि मानव सद्गुरु होण्याच्या लायकीचा असत नाहीं ' हा जीवन-सिद्धान्त त्यांच्याहि लक्षांत आला असेल. गुरु आणि शिष्य यांचें ऐक्य जेथें होतें तीच अनुभूतीची चरम अवस्था आहे. त्याचा फक्त ज्याचा त्यालाच अनुभव घेतां येतो. तेथें मौन हेंच व्याख्यान ठरतें. ' अहम्-सोहम् ' हीं देखील मावळतात. विश्व आणि विश्वेश्वर एकरूप होतात. ' सा काष्ठा सा परा गतिः । '

म. गांधीभवन, कोथरूड, पुणें २९
२२ जुलै १९७२

स. ज. भागवत

## प्रसादचिह्न : एक हृद्गत

'प्रसाद' मधील प्रत्येक कविता स्वरूपाच्या म्हणजे भगवंताच्या शोधातून व बोधातून जन्माला आली. या कवितेचे भगवंताशी नाते अतूट आहे. ती भगवंताचा 'प्रसाद' आहे. हा शोध आणि बोध जितका सोपा तितका कठिण, जितका आनंदविभोर तितका कष्टप्रद, जितका गूढ तितका क्षणोक्षणी स्वसंवेद्य, सहज आहे. हा अंगी मुरायला कालाची जरूरी नाही, आणि तरीही त्याला खूपच काळ लागतो. हा प्रवास करताना कधी कधी 'वाचा अनावर' होते व ती काव्यातून साकारते ...

'जाग' नंतर एक तपाहून अधिक काळ लोटल्यावर, आलेली जाग अनेक दिव्यांतून व कसोटींतून, अनेक दिव्यानुभूतींचे सौभाग्य भोगून 'प्रसाद' रूप घेऊन आली. भगवच्चरणी विलीन व समर्पित होण्यातच तिची सार्थकता आहे. सागराच्या पाण्याची वाफ होऊन तिचे ढग बनतात व शेवटी त्यांची जलवृष्टी सागरालाच येऊन मिळते. ● ● ●

प्राचीन व अर्वाचीन संतांचे जे वाङ्मय हृदयाला भिडले, त्यातल्या काहींचा सहज अनुवाद करताना त्या महात्म्यांशी समरस होण्याचे भाग्य मला मिळाले. वस्तुतः हे अनुवाद म्हणजे आत्मसंवाद, सृजनशील सत्समागम होय. शंकराचार्य, कबीर, रवीन्द्रनाथ, अरुणगिरिनाथर यांच्याबरोबरच सैची या बौद्ध शिन पंथाच्या संताचे ऋण माझ्यावर आहे. त्याची मुक्तिसूक्ते डॉ. सुझुकींच्या इंग्रजी अनुवादातून वाचली व त्यांनी मी झपाटला गेलो. ती जितकी रोख-ठोक व प्रत्ययकारी तितकीच काव्यमय व साधकाला सत्यनिष्ठ दृष्टी देऊन धुंद करणारी आहेत. बुद्धाच्या ज्ञानपूर्वक नामस्मरणाने– 'नमु–अमिदबुत्सु' या मंत्राच्या–तो स्वतः बुद्ध झाला. 'बुद्ध' हा माणसाचा अखंड

सांगाती आहे आणि स्वतःचे परिवर्तन व निराकरण ( Transformation and effacement ) झाले म्हणजे हा लोक परंधामच आहे हे सर्व धर्मांत आढळणारे – विशेषतः वेदान्तातले – सत्य एका आगळ्या, ताज्या पद्धतीने त्याने आविष्कृत केले. त्याची ही उत्कट व जिवंत अभिव्यक्ती आजच्या माणसालाही अत्यंत मोलाची आहे. सामान्य माणसाला सैची धीर देतो. दुःखांत, दोषांत व दुष्टतेत, चिखलात कमल उगवावे त्याप्रमाणे, तो आनंदच उमललेला स्वानुभवाने दाखवितो ... • • •

आधुनिक काळातले महान ज्ञानी श्रीभगवान रमणमहर्षि यांच्या पवित्र ब्रह्मनिर्वाणदिनी हा 'प्रसाद' प्रकाशित होत आहे व तो अंतिम स्वरूपात रसिकांच्या चरणी गुरुपौर्णिमेच्या दिवशी समर्पित होत आहे हा एक गोड योगायोग आहे. 'प्रसादचिन्ह' आहे. 'प्रसाद'ला आशीर्वाद व उत्तेजन मिळाले तेही तितक्याच ज्ञानी महापुरुषाचे – पू. स्वामी स्वरूपानंदांचे. प्रकृतीची विकलता असूनही मोठ्या आनंदाने आणि प्रेमाने 'प्रस्तावना' लिहिली रसिकवर्य ऋषितुल्य आचार्य स. ज. भागवत यांनी. रसिकतेने वाचून प्रेमळ व मोलाच्या सूचना केल्या अनेक सहृदय स्नेह्यांनी : विशेषतः प्रा. म. अ. कुलकर्णी, प्रा. आनंद यादव, प्रा. नि. ना. रेळेकर, प्रा. शशिकांत फडणीस आणि स्वामी सत्यदेवानंद सरस्वती यांनी. "Mysticism : Christian and Buddhistic" हे पुस्तक–ज्यात सैचीची गीते आहेत– मला भेट म्हणून दिले ज्ञानवृद्ध प्रा. आर. सदाशिव अय्यर यांनी. प्रा. चंद्रशेखर जोशी यांनी श्री. शशी मांगोरे यांच्यासह मुखपृष्ठ सजविले व 'प्रसाद'च्या जडणघडणीस हातभार लावला. महाराष्ट्र ग्रंथ भांडारचे संचालक श्री. दादा, प्रा. शशिकान्त कुलकर्णी व त्यांचे कर्मचारी यांनी तो प्रकाशात आणण्यास सहकार्य दिले. गो. कृ. गोखले कॉलेजच्या रसिक प्राचार्यांनी– श्री. एम्. आर. देसाई यांनी– शुभेच्छांचे पाठबळ दिले. या सर्वांचे व इतर अनेकांचे ऋण माझ्यावर आहे.

रसिक व प्रेमळ वाचकांनी, साधकांनी हा भगवंताचा 'प्रसाद' चित्ताला हळुवारपण आणून गोड मानून घ्यावा ही प्रार्थना.

'सकळ करणें भगवंताचें । आणि कवित्व काय मानवाचें ?'

– रसगंगाधर

# अनुक्रम

## विभाग : १


पृष्ठे

अरुणाचला ! ... १
दर्शन ... ६
क्षण ... ७
सारे कसे नको होते ... ८
स्मृति ... १०
सत्य ... ११
जाग तुला जर ... १२
दुःख ... १३
मेहेरबाबा ... १४
चाळशी ... १५
प्रेत ... १६
पुस्तकी ... १६
साक्षात्कार ... १७
मृत्यु ... १८
घरकुल ... ११
स्मशानखडकी :
An Epitaph ... २०
दीन का असा रे ? ... २१
कळण्यापासून वळण्यापर्यंत ... २२
देववेडा ... २३
कधी येतोस ... २४
नवल ... २५

पृष्ठे

हिरवे हिरवे रान ... २६
घर ... २७
हे मन सावध राहि ... २८
गुरुदेव ! ... २८
ज्ञानेश्वरमाउली ... ३०
मृगजळ ... ३१
मैफल ... ३३
मूकसंदश ... ४४
वेड ... ३७
थाटमाट ... ३७
पक्षी येताच ... ३८
शब्द तुझे तुला घे रे ! ... ३९
भगवान् रमण : आरती ... ४०

विभाग : २

एकवीस अभंग ... ४१–६२

विभाग : ३

पाच अनुवाद :
१ श्रीशंकराचार्य ... ६३–६५
२ कबीर ... ६६–६८
३ रवीन्द्रनाथ ... ६९–७८
४ अरुणगिरिनाथर ... ७९–८०
५ सैचीची मुक्तिसूक्ते ...८१–१४४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2353 काव्य
दा. क्र. 22498
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# प्र सा द

# कविता

चत्वारि वाक् परिमिता पदानि
तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः ।
गुहा त्रीणि निहिता नेङ्गयन्ति
तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति ॥

– ऋग्वेद १-१६४-४५.

# भगवान् रमण-अरुणाचल



‘ तुजला स्मरता होते मोक्षधारणा ’

( पृ. ४० )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 2303 / 22598 काव्य
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

**अरुणाचला !**

अरुणाचला !
तुझ्यावर भाळलेला
एक पोर
घरदार सोडून
एक दिवशी
तुला बिलगला,
तो दिवस
तुझ्या आयुष्यात
सोन्याचा होता !

त्याच दिवशी
विश्वाच्या इतिहासाचे
एक नवे पान उघडले ! –
हे तुला माहित होते ?
त्याचे स्वागत करण्यासाठी
दिशांना चारी
तू तोरणे लावली होतीस ?

कृपेने तुझ्या
याच पोराचा
एक ' रमण-महर्षि ' झाला !
आणि शतक अर्धे तुझ्या मांडीवर पडूनच,
केवळ विश्वासाठी जगून
तुझ्यातच सामावला !
या अर्धशतकातच
याने मानवाच्या जटिल प्रश्नांना
न बोलताच उत्तरे दिली ;
आणि काहीही न करता
सारेच करून दाखविले !

लक्ष्मीच्या राज्यात लोळूनही
दरिद्री राहिलेल्या भिकाऱ्यांस
याने हृदयातल्या राज्याचे वैभव देऊन
श्रीमंत केले !

आणि पोट भरूनही
उपाशी राहिलेल्यांची याने
अनंत काळची भूक भागविली !
सत्ताधीश असूनही
दुबळे बनलेल्यांना
याने खरी सत्ता दाखविली ;
आणि ज्ञानवंत असूनही
अंधारात चाचपडणाऱ्या पंडितांना
याने खरे ज्ञान दिले !
पोरक्यांना याने
आपल्या पोटाशी घट्ट धरले;
आणि रडणाऱ्यांचे अश्रू
याने सहजच पुसले !

आणि झोपले होते जे
त्यांना याने
प्रथमच जागे केले !
रंजल्या गांजल्या अनिकेतांना
याने सहज आपले म्हटले;
आणि खऱ्याखुऱ्या घराची
त्यांना वाट दाखविली....
सुवर्णालाच
ज्यांनी होते देव मानले,

त्यांना याने
खरा देव दाखविला;
आणि ज्यांनी
मानलाच नाही देव कधी,
त्यांनाच याने देव करून
कायमचेच गप्प केले !

याच्याकडे जो जो गेला
तो तो कधी परतलाच नाही ;
ज्याला याने धरले होते,
त्याला कधीच सोडले नाही !

हा रात्रंदिवस जळत होता ;
जळता जळता पण हा
केवळ प्रकाश देत होता
मंद सुगंध वाटीत होता !
थंडी, वारा, ऊन, पाऊस
सारेच हा सोशीत होता ;
सोसता सोसता पण हा
शीतल सावली देत होता !
साधा माणूस असून हा
माणूस मात्र खास नव्हता ;
आणि देव असून हा
देवासारखा अगम्य नव्हता !

याच्या डोळ्यांत
बोध होता ;
शोध होता ;
याच्या डोळ्यांत
कौमुदीचा झोत होता !
कैवल्याचा स्रोत होता
याचे मौन वेद होते;
याचे मौन शास्त्र होते !
याचे मौन शारदेच्याही विलासांहून
बोलके होते !

याचे जीवन
साधेसुधे जीवन नव्हते;
अजूनवर जे लिहिले नव्हते,
असे ते एक ' काव्य ' होते ! ....
याचे मरण
मरण नव्हते;
मरणालाही जिंकणारे
अमृताला लाजवणारे,
कारुण्याने ओथंबलेले
ते एक ' महाकाव्य ' होते !

◆ ◆

## दर्शन

डोंगराच्या पायथ्याशी उभे असलेल्यांना
वर घेण्यासाठी
जेव्हा मी हात पसरतो
तेव्हा ते तिथपर्यंत पोचतच नाहीत.
पुष्कळदा, मी मात्र
डोंगरावरून गडगडत खाली येतो.

.... पण जेव्हा मी
डोंगराच्या शिखरावरच
स्थिर उभा राहतो,
नि डोळे मिटून घेतो.
तेव्हा....डोळे उघडल्यावर....
पायथ्याशी उभे असलेले सारेजण
माझ्याजवळच शिखरावर असलेले
मला दिसतात !

◆ ◆

## क्षण

क्षण तुझ्या कानांत
किलबिलणाऱ्या गोष्टी करतात
त्या ऐक ;
पण विसरून जा शब्द—
फसवे नि रुसवे ....

क्षण तुझ्या अंगाला
गोजिरवाण्या गुदगुल्या करतात
त्या भोग ;
पण विसरून जा हर्ष
हसरा नि जीवघेणा.

क्षण तुला रडवतात
रक्तबंबाळ करतात ;
तू विद्ध हो;
पण विसरून जा ते अश्रू
अळवाच्या पानावरले....

क्षण तुला पेटवतात
मोह—कढईत शिजवतात
तू आग हो ;

पण विसरून जा कढ
आगीच्या घरचे.

म्हणजे शेवटी शून्य उरते
क्षण क्षणात भिजतो, विरतो
गोड गोड मिठी देतो
त्याची मिठी पकडायची नसते
शेवटी सारेच विसरायचे असते
सर्व क्षणिकम् । सर्व सुखम् ।

◆ ◆

## सारे कसे नको होते

सारे कसे नको होते
एकलेपण बरे वाटते....

आकाशाला सूज येते
वारा शिळी जांभई देतो
झाडे सुस्तीत पेंगत बसतात
प्रकाशावर गंज चढतो....

जिथे जिथे प्रीत जडली
तिथे तिचीच फुले सुकतात
तळ्यातल्या लांब गार सावल्या
तिथल्या तिथेच गोठून जातात....

सूर्याचा होतो लामणदिवा
पाखरे मुकी बहिरी होतात
एकटीच घार मंद तरंगते
तिला पंख ओझे बनतात ....

लाल आगीवर चढते राख
हिरव्या डोंगरांचा उतरतो माज
तल्लख गुरे, वासरे सुस्तावती
धुक्याचे माजते अंधुक राज्य....

रुसलेले चोरटे मंथर मन
हलकेच स्वताशी पुटपुटत राहते–
" फिरून फिरून थकली भागली
बळेच सृष्टी फरफटत चालते...."

सारे कसे नको होते
एकलेपण बरे वाटते....

## स्मृति

आज पुन्हा वाचताना
जुन्या कवितेच्या ओळी
अचानक अंतरात
वीज कशी थरारली !

ऊन कोवळे पडले
मऊ रेशीम होऊन
आज फार दिवसांनी
आली पश्चिम न्हाऊन ....

दुरावले तुटलेले
दुवे आजला जुळले
अवघडलेले स्वप्न
अनाहूतसे फळले....

स्मित गाली तरळले
श्वास मंद मंद चाले
तुझ्या स्मृतिसुगंधाने
विश्व विश्व दर्वळले ....

शोधक मी ! शोधतोच
माझे काही हरवले
जुनी कविता बनून
तेच आज घरी आले !

◆ ◆

## सत्य

सत्य सहज रे बालक सुंदर !
कशास इतकी लेणी अवजड ?
शब्दांचे त्या वेष मुलायम
ग्रंथांच्या वा राशी अवघड ?

सत्य इथे या क्षणी उमलते
हसऱ्या डोळ्यांतून बोलते !
उद्यानी या बागडताना
विश्वाच्या ते मिठीत दडते....

बघता बघता लपते, छपते
शीळ सुंगधी घालित बसते;
तत्त्वज्ञांना चुकवुन झुकवुन
वेड्याच्या खांद्यावर निजते...

इथे जरासा थांब क्षणभर
प्रवास आवर, धुंद मुशाफिर !
तुझ्या घरातच हसरे बालक—
उचल तयाला घेइ कडेवर ....

◆ ◆

## जाग तुला जर

जाग तुला जर सहजच आली
कशास आता ओढ अनावर ?
कशास आता हवेत तुजला
स्वप्नामधले विजय मनोहर ?

स्वप्नामधले दृश्य नसूनी
दिसत असावे, तसले जीवन !
जागेपणिची अपार शांती !
तिला न साहे असली फसवण.

कधी लागते अमृताला का
मरणपणाची तहान भीषण ?
कधी लागते आकाशाला
संकोचाची भूक विलक्षण ?

नकोस फसवू स्वतास आणिक
नकोस भुलवू इतरांनाही
जाग जरी ही असेल वास्तव
ईश्वर बिलगुन राहिल पायी !

◆ ◆

## दुःख

सावळ्या रंगाच्या गायीसारखे
मृत्यूच्या सावलीसारखे
असते दुःख....

ते करते एकाकी–
सहारा वाळवंटातल्या
अनवाणी वाटसरूसारखे–
वर तळपतो मार्तण्ड
खाली अंगारते वाळू !–
एका क्षितिजापासून
दुसऱ्या क्षितिजापर्यन्त.

ते नेते खोल दरीत
दाखवते रंगीबेरंगी चित्रे
यमपटातली–
पापाची बटबटीत फलिते.

....आणि अचानक वर नेते
निळ्या डोंगराच्या शिखरावर
दिव्य मंदिराच्या महाद्वाराशी
स्वतः अदृश्य बनून.

◆ ◆

## मेहेरबाबा

असा मौनाचा सम्राट
किती बोलका परंतु !
त्याच्या प्रेमाच्या राज्यात
गुप्त झाले सारे किन्तू ....

लाल गुलाबी स्मिताने
उजळले विश्वभाळ,
दोन डोळ्यांत गहिऱ्या
लागे अज्ञात—चाहूल ....

रोमरोमात भिनले
धुंद संगीताचे सूर,
अशी रंगता ' मंडळी '
आला कैवल्याला पूर ! ....

भिडे हृदया हृदय
काय घडे नच कळे !
त्याचे माझे गूढ नाते
क्षणी अभंग जडले ....

गंगा सागरा मिळता
महासागर मी झालो
एका पुरुषा भेटता
' महापुरुष ' मी झालो !

◆ ◆

## चाळशी

आलो चाळिशीच्या घरी
पत्ता नाही चाळशीचा
अंधारल्या प्रकाशात
अडखळे खात ठेचा....

होतो चार ना वर्षांचा
सारे होते मुक्तद्वार
पंख होते गरुडाचे
चाळशीही डोळ्यांवर....

हळू हळू तेच पंख
माझे मला ओझे झाले
अचानक चाळशीची
काच कुठे कशी गळे....

आलो चाळिशीच्या घरी
पत्ता नाही चाळशीचा
खुळ्या दुखऱ्या पंखांना
आज फुटतसे वाचा !

◆ ◆

## प्रेत

दुनियेच्या बाजारात
होतो पुरा बिघडलो
रंगीबेरंगी कातडी
रोज नवी पांघरलो....

....एका भल्या पहाटेला
स्वप्न भयाण पडले :
कातड्यांच्या ओझ्याखाली
माझे प्रेत मी पाहिले !

◆ ◆

## पुस्तकी

पुस्तकांतला
पुस्तकीच मी
पुस्तक बनलो !
पुस्तकाचिया
पुळाच खालुन
गेले जीवन
केवळ वाहुन !

◆ ◆

## साक्षात्कार

कुणि पृथ्वीवरती मातृभक्त तो झाला
तो येता जाता "आई दैवत !" वदला
आईची पाखर त्याला राखत होती
तो हासत, खेळत, मजेत दिवसा-राती ....

परि दृष्ट लागली त्याच्या मातृप्रेमा
त्या कुणी भेटली नयनमनोरम श्यामा
त्या वेड लागले धवलांगीचे एका
विसरला आपुल्या माउलिच्या तो हाका....

त्या म्हणे वल्लभा-"करी एक मम काज-
जर असेल प्रीती-आईचे आण काळीज"
तो थिजला, भिजला सर्वांगी थरथरला !
पण प्रीतदेवता हवीच होती त्याला ....

तो हळूच गेला, निश्चय त्याने केला....
झोपल्या आईचे काळिज घेऊन आला !
अन् घाईमध्ये अडखळला वाटेत...
ते पडले काळिज, तोहि पडे दगडात...

तो शब्द आईचे काळजातुनी उठले—
" रे बाळा ! तुजला फार लागले का रे ? "
....त्या क्षणी बाळ तो झोपेमधुनी उठला—
ती मायमाउली जगभर दिसली त्याला !

◆ ◆

## मृत्यु

हा एक बुडबुडा जीवनपृष्ठावरती
किति नाट्य रंगले होते याच्या अंती !
पण अवचित फुटता क्षणात एके दिवशी,
ते तसेच जीवन-पृष्ठी आणि तळाशी.

त्या अंतहि नाही, आरंभहि त्या नाही ;
ते अखंड वाहे जीवन येथ प्रवाही !

◆ ◆

## घरकुल

वाऱ्यावरती घरकुल बांधुन
तेजाच्या मी कुशीत दडलो
समुद्रातले खारट पाणी
आचमून मी अगस्ति बनलो !

चराचराशी हितगुज करता
मातीसंगे खेळ खेळलो
वृक्ष–झऱ्यांचे ऐकत कूजन
लताफुलांशी नाच नाचलो !

हिरवळीतल्या दवबिंदूंनी
अश्रूंची मज ओंजळ दिधली
वटवृक्षाच्या झोपाळ्यावर
बघता बघता झोप लागली

रविबाळांशी जमली गट्टी
डोळे झाकी संध्या-माई
केसांमधुनी हळूच माझ्या
बोटे फिरवी रजनीताई !

सृष्टि म्हणाली "बाळ" मला अन्
नभ म्हणते मज-"दादा ! दादा !"
माळावरली फुले चिमुरडी
हाकारित मज- "बाबा ! बाबा !"

"नाथ" अणूंतिल लक्ष्मीचा मी
फूलपाखरांचा मी "मामा";
अवतीभवती सगेसोयरे
इथे विनटला माझा आत्मा !

◆ ◆

**स्मशानखडकी : An Epitaph**

लिहायचे जर असेल तुजला
स्मशानखडकी, नुरता काय
एक ओळ ही लिही कोवळी :
"याने धरिले सद्गुरु-पाय"...

◆ ◆

## दीन का असा रे ?

समुद्रात वसती करुनी
कोरडा कसा रे ?
घरी कामधेनू असुनी
ताक मागशी रे !

अमृताचा कुंभ स्वये तू
तुला का तहान रे ?
प्रकाशात नाहत असुनी
आंधळा कसा रे ?

दिव्य गीत कानी पडता
बधिर तू कसा रे ?
स्वयंपूर्ण केवल असुनी
दीन का असा रे ?

## कळण्यापासून वळण्यापर्यंत

कळण्यापासून वळण्यापर्यंत
दोन ध्रुवांचे अफाट अंतर
एक वावरे धरतीपाठी
दुजे बसते आकाशावर.

कळण्यापासून वळण्यापर्यंत
एक निरुंद खोल दरी
एका टोकास मृत्यू उभा
दुसरे टोक जीवन धरी.

कळण्यापासून वळण्यापर्यंत
दोन जगांचे अवघड मीलन
एक फुलते झुलते स्वप्न,
दुसरे प्रखर जागेपण ....

कळण्यापासून वळण्यापर्यंत
नसण्यापासून असणे फुटते
फुटता फुटता अंधाराची
झापड कशी दूर सरते !

◆ ◆

## देववेडा

देववेडा ! देववेडा !
त्याच्या अंगणी केवडा....

देववेडा ! देववेडा !
अमृताचा दारी सडा....

देववेडा ! देववेडा !
जगा मुकला बापुडा....

देववेडा ! देववेडा !
नभाहुनी होय बडा....

देववेडा ! देववेडा !
झाला मुका, तो बोबडा !....

◆◆◆

## कधी येतोस

कधी येतोस रे दारी
अवसेच्या काळोखात
दीप मंगल घेऊन
रात रात उजळीत....

कधी येतोस रे दारी
वाजवीत ताडताड
दारे सताड उघडी
वादळ ते फाड फाड....

कधी येतोस दिवसा
आत चोरपावलाने
जशी मावशी अधाशी
येते दुधाच्या वासाने...

कधी येतोस तू दारी
पूर्ण चंद्राच्या मिषाने
माझी आसवे पोरकी
टिपतोस पदराने ! ....

आता येतोस, येतोस
आणि येतोस फिरूनी
वेड लाविलेस मला
माझा झालास तू धनी !

## नवल

असेच होते हिरवे रान
डोंगरमाथा वरती छान ....

चालत होती ढवळी गाय
होते तिजला पिवळे पाय....

तिथेच पडला होता पावा
हातांचा पण नसे सुगावा...

ओठी धरता ठुमकी तान
सहज बहरले हिरवे रान !

नवल असे हे घडले काय ?
गळ्यास माझ्या फुटले पाय !....

## हिरवे हिरवे रान

हिरवे हिरवे रान
गारवेल—पान
मनातले कबुतर
डुले झुले छान....

अंगणातला वारा
आकाशातला तारा
नवे नवे जननमरण
रोज येते दारा....

उंच उंच अस्मान
निळे निळे निशाण
प्रकाशाच्या मुखावर
आज नवी शान....

उधळणारी मुले
गाणारी फुले
केवड्याच्या पानावर
विश्व आज डुले....

## घर

घर दूर सोडुनी जाउ नको...ध्रु.

घर हे शांतीचे रे मंदिर
घर हा आनंदाचा सागर
घर हे स्फूर्तींचे रे आगर
या घरास पळभर विसरु नको....

घर ही लावण्यांची बाग
घर ही ज्ञानरवींची जाग.
घरात अक्षय सुख, अनुराग
या घरा पारखा होउ नको ....

घरात सद्गुरुपद सुकुमार
घरात अवतारांचा वावर
घर हे मोक्षाचे माहेर
या घराविना जग पाहु नको....

घरात शंकर, घरात भास्कर
घरात गंगा यमुना सागर
घरात अंबर, घरात गिरिवर
या खऱ्या घराविण राहु नको
घर दूर सोडुनी जाउ नको....

◆ ◆

## हे मन सावध राहि

हे मन सावध राहि सदैव....ध्रु.

सहज समाधी सदा रंगता
उघडे रे तव दैव ....

घोर रात अंधारि माजता
' कोऽहं ? ' शोध सदैव....

साधा सोपा असे मार्ग हा
कठिण लंघणे शीव....

प्रकाश भूमीवरी फाकता
उजळुन जाइल जीव....

सद्गुरुला म्हण पाठीराख्या—
" तुझा तूच वाचीव "....

हाच क्षण रे उसळुन येवो
बहरो मुक्ति—पुनीव ....

◆ ◆

## गुरुदेव !

तू हृदयमंदिरी माझ्या रे गुरुदेव
जागवीत कोमल अंतरातला भाव ....

तू गाभाऱ्यातिल लसलसणारी ज्योत
पाजळीत अवघा अंतरातला ध्वांत....

तू अंगणातले माझ्या चंदनझाड
उधळीत राहशी सुगंध अवघा वाड ....

तू श्वासामधला श्वास माझिया सोऽहम्
संगीत घुमविशी दिशादिशांतुन ते ' ॐ '....

तू प्राणाहुनिही प्राण माझिया प्यार
तू दिलेस जीवन काळाच्या जे पार ....

तू अग्नी जाळिशि , होतो मी कापूर
तू मला फुलविशी, होतो मी अंगार ....

◆ ◆

## ज्ञानेश्वरमाउली

अंतरातल्या नील नभातिल
घुमणारा तू मधुर पारवा
भागीरथिचा काठ उन्हाळी
संध्येचा तू थंड मारवा....

थकलेल्या गात्रांवर दुखऱ्या
म्लान मनाची शीर ठणकते
तुझी रेशमी स्पर्शपालवी
हलके तीवर मर्दन करते....

चुकलेल्या पोरक्या बालका
शतजन्मांची ‘ आई ’ मिळते
तव अंकावर हिवाळ्यातल्या
उन्हात कवळ्या लोळण घडते !

## मृगजळ

मृगजळ पाहिले, खूप धावलो
तहान माझी भागलीच नाही ;
ऊर फुटला, रक्त ओकलो
मनात म्हणालो, ' नाही ! नाही ! '

सागरावर एकादी लाट उठते
कवळू पाहतात धावरे हात ;
लाट हुकते, प्रहारच उरतो
ठणकत राहतात माझे हात !

मृत्यूने एकदा जवळ बोलावले;
हलकेच मला हसून म्हटले—
' ....सारेच वेड्या विराट मृगजळ !
मीही त्यातलीच प्रचंड लाट... '

मृत्यूची माझी जुनाट दोस्ती !
त्याचा सल्ला मी नेहमीच घेतो;
जीवनाच्या ताटात मरणाचा भात
नेहमीच मला वाढलेला असतो !....

प्रकांड–पंडित, तत्त्वज्ञ भेटले,
कवि, साहित्य–विशारद पाहिले;
जखम माझी ( पण ) ओलीच राहिली
सारेच होते मृगजळात बुडले !....

एकच कडवट सत्य प्यालो
तहान माझी त्यानेच भागली :
" कधीच ही धाव संपत नाही.
कधीच हे मृगजळ आटत नाही....
असून नसते मृगजळ त्याला
सोऽहंभावामृत निर्मळ जो प्याला."

## मैफल

नको माझे तुणतुणे
तुझा नगारा वाजू दे....

नको माझी चिवचिव
तुझी गर्जना घुमू दे....

नको माझे तमपण
तुझी आग ती पेटू दे....

पुरे शिळे मृगजळ
जळ शीतळ वाहू दे....

पुरे पुरे हा तमाशा
धुंद मैफल रंगू दे ! ....

◆ ◆

## मूक संदेश

गौतमा !
ज्या प्रचंड बोधिवृक्षाखाली
तुला निर्वाणपद लाभले
त्याच्या गर्द सावलीत
मी निवांत पहुडलो
आणि पुरता निवलो !
माझ्या अवघ्या इंद्रियांचे
पारणे फिटले;
ती खळखळून जणू हसली.

तुझा आत्मा
माझ्या आत्म्याला
तेव्हा कडकडून भेटला ;
आणि म्हणाला –
" तुला मी इथे बोलावले
म्हणून तू आलास—
जरी मी तुझ्याजवळच,
नव्हे तुझ्यातच आहे.
हे घे या बोधिवृक्षाचे पान
माझी अखंड आठवण म्हणून. "

मी ते पान –
गौतमाचे अभिज्ञान –
प्रेमाने घेतले
आणि तृप्त पण जड पावलांनी
परतलो ....

पण हे काय ?
याच मंदिराच्या आवारात
हे कसले भयंकर दृश्य ?
मी अवाक् झालो.

गौतमा !
ज्याला पाहून
तू उबगलास
आणि संन्यासी झालास
तो गलितगात्र
मळक्या फाटक्या कपड्याचा
भिकारी—
दीन चेहरा करून
पोटावर एक हात ठेवून
आणि दुसरा पुढे करून–
मला म्हणाला
'बाबूजी ! पैसा !'

कसे बसे एका हाताने
पाच पैशांचे नाणे
खिशातून काढले
आणि दुसरा हात
कपाळावर ठेवला ! ....
आणि म्हणालो—
" गौतमा !
तू प्रश्न सोडविलास
पण तुझ्यापुरताच !
पण तो प्रश्न अजून आहेच
आजच्या मानवापुढे :
दारिद्र्य ? दुःख ? जरा ?
आजारपण ? मरण ?
हेच का तुझ्या
धर्मचक्रप्रवर्तनाचे फलित ? "

गौतमाने
दिले नाही काहीच उत्तर.
तो तसाच शांत शांत होता !
बोधिवृक्ष डौलात उभा होता ! !
मला मूक संदेश
देत होता –
" बुद्ध हो !– म्हणजे कळेल
प्रश्नाचे तुझ्या उत्तर. "

◆ ◆

## वेड

वेड मला न शब्दांचे
आहे शब्दांपल्याड त्या
आकाशीच्या वावडीचे....

वेड मला न भोगांचे
आहे भोगांपल्याड त्या
मेघाआडल्या नभाचे ....

वेड मला न मातीचे
आहे मातीपल्याड त्या
बागेतल्या चंपकाचे....

◆ ◆

## थाटमाट

दिव्यावरली काजळी
आधी झडू दे जुनाट
प्रकाशाच्या विलासाचा
मग होई थाटमाट....

◆ ◆

## पक्षी येताच

पक्षी येताच घरात
मन गंगाजळ झाले
घर तीर्थाचि बनले ....

पक्षी येताच घरात
विश्व सोयरे गमले
पंख घराला फुटले,...

पक्षी येताच घरात
घर झाले रे आकाश
घर झाले वटवृक्ष....

पक्षी येताच घरांत
चार दाणे तैं टिपले
घरी मेहुण जेवले....

पक्षी येताच घरात
त्यांची इवली पाउले !
देवराय घरा आले ! !

## शब्द तुझे तुला घे रे !

शब्दांचेच गोड पिसे
येईल रे तुझ्या आड
सोनियाच्या सुरीनेच
माझे फाटेल छाताड ....

दूर राहील विठाई
दूर माझी इंद्रायणी
कुणा भग्न शापिताची
व्यर्थ शिणेल रे वाणी....

शब्द तुझे तुला घे रे !
मला नको अशी भिक्षा.
तुझ्या मौनाच्या राज्यात
बरी निरंतर शिक्षा....

## भगवान् रमण : आरती

सद्गुरु परमानंदा निजभक्तरमणा
अरुणाचलवासी तू हृदयातिल अरुणा ।
सर्वसाक्षी तू आत्म्याची करुणा
तुजला स्मरता होते मोक्ष–धारणा ॥

जय देव जय देव जय जय गुरु रमणा
अपार महिमा तूझा गातो मनरमणा ॥१॥

भक्ती मुक्ती शांती वरिते तव भक्ता
अभंग अखंड चिन्मय करिते बलयुक्ता ।
भाव पुरे गुरु तुजला सर्वंकष नुसता
मौनी उपदेशाची स्फूर्ती ये चित्ता ॥

जय देव जय देव जय जय गुरु रमणा
अपार महिमा तूझा गातो मनरमणा ॥२॥

'मी कोण ? कोठला ?' एकच विचार
राहो आमुच्या चित्ती अन्य न अविचार
मुरून जावो आमुचे मीपण साचार
ध्यासातुन लाभो या निज–साक्षात्कार ॥

जय देव जय देव जय जय गुरु रमणा
अपार महिमा तूझा गातो मनरमणा ॥३॥

# अभंग

१

राजमार्गी जाता । कुतरे भुंकते ।
मागे मागे येते । रागे रागे ॥ १ ॥

भाकरीचे दोन । तुकडे टाकता ।
पाय ते काढता । घेते वेगे ॥ २ ॥

तसे मज नको । करू जगन्नाथा ।
कुतऱ्याची कथा । माझी नसो ॥३॥

नको मज काही । तुजविण दुजे ।
आवर हे तुझे । खेळ आता ॥४॥

रस म्हणे आता । दमलो मी पुरा ।
विटलो संसारा । एकदेशी ॥५॥

◆ ◆

२

आनंदाचे रोप । अंगणी लाविले ।
आनंदाचे आले । कोंभ त्याला ॥ १ ॥

आनंदाची पाने । त्यांतून फुटली ।
आनंदाची आली । शुभ्र फुले ॥ २ ॥

आनंदाची फळे । त्यास लगटली ।
आनंदाची झाली । गंधवृष्टी ॥ ३ ॥

आनंदाच्या झाडा । आनंदाचे पाणी ।
आनंदाचे आणि । मातीखत ॥ ४ ॥

आनंदाच्या झाडा । आनंद कुंपण ।
आनंद राखण । करावया ॥ ५ ॥

आनंदाचे झाड । गगना भिडले ।
गगनही झाले । आनंदाचे ॥ ६ ॥

रस म्हणे झाला । आनंद अथांग ।
बुडले अंगांग । आनंदात ॥ ७ ॥

◆ ◆

३

आणिकांचे डाग । टिपायला येलो ।
मोठा डाग झालो । मीच स्वता ॥ १ ॥

आतून वरून । झालो निळाकाळा ।
तांबडा, जांभळा । बहुरंगी ॥ २ ॥

आता तरी पुढे । एवढी भलाई ।
उरलोच नाही । टिपावया ॥ ३ ॥

रस म्हणे जिणे । टिपकागदाचे ।
आम्हा मानवांचे । आधुनिक ॥ ४ ॥

४

बरे झाले देवा । अंधारात वास ।
प्रकाशाचा श्वास । सोसवेना ॥ १ ॥

बरे झाले देवा । फुटला नगारा ।
शून्याचाच वारा वाहू लागे ॥ २ ॥

बरे झाले देवा । मित्र न पिकला ।
हिरवा एकला । फकीर मी ॥ ३ ॥

बरे झाले देवा । सापांची संगत ।
ज्योतीची पंगत । भुकेल्याला ॥ ४ ॥

बरे झाले देवा जगाला बुडालो ।
तुला सापडलो । अवचित ॥ ५ ॥

रस म्हणे बरे । अवघेच झाले ।
मीपण गळाले । आपोआप ॥ ६ ॥

५

कधीकधी जातो । देउळास भावे ।
पण आठवावे पायताण ॥ १ ॥

तुझ्या पायामाजी । चित्त घुटमळे ।
पण येतो बळे । बाहेरचि ॥ २ ॥

असा कच्चा अर्धा– । मुर्धा शिजलेला ।
अर्धा फाटलेला । तुझा दास ॥ ३ ॥

फाटकी ही त्याची । शींव रे लक्तरे ।
सांभाळ बापा रे । लाज त्याची ॥ ४ ॥

रस म्हणे आलो । सर्वथा शरण ।
गेला भागशीण । अर्धेपण ॥ ५ ॥

◆ ◆

६

नव्या प्रकाशाचा । नवा मी पाईक ।
आडमार्गी सुख । रोधलेले ॥ १ ॥

नवीन टाकावे । एकेक पाऊल ।
घेऊन चाहूल । अंधाराची ॥ २ ॥

मळलेल्या वाटा । फसली पाउले
गुदमरलेले । प्राण माझे ॥ ३ ॥

नवीन वाटेचा । नवा वाटसरू ।
कोणाला विचारू । अनाहूत ॥ ४ ॥

चिखली गुंतला । अनवणी पाय ।
हंबरते गाय । रुतलेली ॥ ५ ॥

रोधले पाऊल । पुढे झेप घेते ।
तीच वाट होते । एक नवी ॥ ६ ॥

रस म्हणे आता । नेई मज पुढे ।
तुजला साकडे । माझे देवा ॥ ७ ॥

◆ ◆

७

ऐकता ऐकता । एकलाच होशी ।
आनंदाच्या राशी । मागेपुढे ॥ १ ॥

अवघ्या कलांत । श्रवणाची कला ।
सकल सुखाला । मेळवील ॥ २ ॥

श्रवणाची गोडी । संसाराते तोडी ।
नेई पैलथडी । क्षणार्धात ॥ ३ ॥

असेच हे चालो । अखंड श्रवण ।
नको वृथा शीण । आडमार्गी ॥ ४ ॥

रस म्हणे झालो । कृतार्थ श्रवणे ।
धन्य झाले जिणे । अभाग्याचे ॥ ५ ॥

८

नित्यनियमाची । चुकलीसे फेरी ।
फिरणे आले घरी । आज माझ्या ॥ १ ॥

एकाच जागेस । निष्ठेने बैसलो ।
विश्वाचाच झालो । सोयरा मी ॥ २ ॥

' न कर्त्याचा वार ' । म्हणे ' शनिवार ' ।
' असण्याचा वार ' । आज झाला ॥ ३ ॥

तेच ते आकाश । तेच वृक्ष, पक्षी ।
नित्य नवी नक्षी । आज झाली ॥ ४ ॥

शोध घेता घेता । श्रेय हरपले ।
मज गवसले । अवाचित ॥ ५ ॥

रस म्हणे सुटे । यांत्रिक नियम ।
सहज तो धर्म । मग भेटे ॥ ६ ॥

• •

## ९

काहीतरी होते । डोळ्यांत या बळ ।
म्हणून वादळ । उठविले ॥ १ ॥

काहीतरी होता । हृदयात भाव ।
म्हणून तो देव । आठवला ॥ २ ॥

काहीतरी होते । मनालागी पिसे ।
म्हणून कोळसे । हिरे झाले ॥ ३ ॥

काहीतरी होते । हातात इशारे ।
म्हणून पांढरे । काळ्यावर ॥ ४ ॥

काहीतरी आहे । मातीत या आग ।
म्हणूनिया वेग । रुधिराला ॥ ५ ॥

रस म्हणे नको । खोटा अभिमान ।
तुझेच हे गुण । देवराया ॥ ६ ॥

◆ ◆

## १०

प्रकाशपुरी या । अंधाराचा बरा ।
खडासा पहारा । वज्रबंद ॥ १ ॥

अंधविणारा । प्रकाशाचा जाच ।
हिऱ्यासाठी काच । मुठीमाजी ॥ २ ॥

अजाणता ओठी । माउलीचा स्तन ।
अगाध हे ऋण । आभाळसे ॥ ३ ॥

रस म्हणे तुझे । छत्र आम्हांवरी ।
म्हणून मुरारी । सुरक्षित ॥ ४ ॥

◆ ◆

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ...
ग्रं. क्र. (स्थळ ...)

## ११

मागे आणि पुढे । धावते हे मन ।
स्थिरावे न क्षण । एक मात्र ॥१॥

सदैव चंचल । वाऱ्याने अंचल ।
व्यभिचारी शील (?) । अप्सरेचे ॥२॥

भूतावरी भाव । भविष्याची हाव ।
वर्तमानी ठाव । मुळी नेणे ॥३॥

याचिया पदरी । अशांतीची रक्षा ।
रस म्हणे 'भिक्षा । वाढा माई' ॥४॥

◆ ◆

[library stamp, illegible]

१२

अंगणात पाय । खाटेवर मन ।
असा छिन्नभिन्न । उधार मी ॥१॥

फाटलेली दृष्टी । फाटलेले डोळे ।
अंतरी उमाळे । फाटलेले ॥२॥

यांतही अभंग । एकली राणीव ।
'भाव तोचि देव' । दाविलेस ॥३॥

रस म्हणे डोई । तुझ्या पडो पायी ।
पाय आणि डोई । एक होवो ॥४॥

◆ ◆

१३

सकाळी उठून । दुर्जन वंदावा ।
सज्जन घालावा । खिशामधे ॥१॥

मध्यमाशी अल्प । विनोद करावा ।
रस्ता साफ व्हावा । दिवसाचा ॥२॥

आलिया पापाशी । शिवी हसडावी ।
वाट ती चालावी । चाकोरीची ॥३॥

आपुलाले दुःख । रात्रीला सांगावे ।
खुशाल रडावे । एकटयाने ॥४॥

सुखाशी करावी । हळू सोयरीक ।
अधिकाची भूक । ठेवू नये ॥५॥

झाकल्या मुठीत । असो द्यावे धन ।
मरावे जपून । गुपचुप ॥६॥

रस म्हणे असे । आजचे जीवन ।
देई संजीवन । प्राणसख्या ॥७॥

◆ ◆

घरा घरा आज । आली अवकळा ।
वरी धर्मशाळा । दो दिसांची ॥१॥

विद्यामंदिरांची पाने । झाली रे दुकाने ।
पदव्यांची पाने । विकायाची ॥२॥

औरस मुलांचे । आईबापा ओझे ।
वाटे—"पाप माझे । फळलेसे" ॥३॥

देह झाला देव । रुपया पुजारी ।
बॅन्केच्या मंदिरी । ध्यान त्याचे ॥४॥

आकाशाच्या खाली । चालला बाजार ।
रोख, ना उधार । इथे दुःख ॥५॥

अगा कृपावंता । चित्र हे विचित्र ।
तुझेच हे गोत्र । कसे म्हणू ? ॥६॥

रस म्हणे तुज । यावे मी शरण ।
युक्ती ही म्हणून । काय तुझी ? ॥७॥

१५

ज्याच्यासाठी केला । काल अट्टाहास ।
तोच आज फास । गळ्याभोती ॥१॥

ज्याच्यासाठी केली । काल आटाआटी ।
त्यातून नरोटी । हाती आज ॥२॥

कधी कधी वाटे । सारेच उलटे ।
पाऊल उमटे । अंधाराचे ॥३॥

नव्हे हा अंधार । ही तर पहाट ।
रस म्हणे वाट । प्रकाशाची ॥४॥

◆ ◆

१६

काटयांतही हित । फुलांतही हित ।
व्यर्थ का शिणत । मन माझे ?   ॥१॥

निळा काळा मेघ । शुभ्र त्याची कड ।
तुझीच आवड । माझी होवो   ॥२॥

तुझा झाल्याविण । व्यर्थ सारा शीण ।
अफाट दारुण । रणांगण   ॥३॥

तुझ्याच रे हाती । जीवनाची माती ।
घडव, मोड ती । इच्छा तुझी   ॥४॥

आनंदनिधान । तूच खरेखुरे ।
अमृत पाझरे । रस म्हणे   ॥५॥

## १७

कडूलिंब आज । मज गोड झाला ।
शुद्ध करी मला । अंतर्बाह्य ॥१॥

" संसार वोखट " । म्हणे " मृगजळ" ।
प्यालो मी ओंजळ । आज त्याची ॥२॥

द्वैतात बाधले । मज जे विकार ।
आनंद–विहार । तोच आज ॥३॥

जसे आहे जग । अगदी तसेच ।
असूनही साच । प्यार मज ॥४॥

तुझ्याच कृपेची । केवढी किमया !।
नाहीतर वाया । रस म्हणे ॥५॥

◆ ◆

माझेच स्वरूप । बोलाविते मला ।
" ये ये माझ्या बाळा । अंतरात ॥१॥

अंगणी खेळून । शिणलास खूप ।
आता घेई झोप । मांडीवर ॥२॥

माझी गूढ साद । तुझ्या पडो कानी ।
निःशब्दाची वाणी । आगळीच ॥३॥

नकोस विसरू । मज एक क्षण ।
तुझ्यासाठी प्राण । आसावले ॥४॥

नकोस विसरू । आपुल्या आईला ।
घराचाच ळळा । लागो तुज ॥५॥

सोनियाचे तुज । देईन भोजन ।
अमृताचे पान । अखंडित ॥६॥

दुराव्याचा वारा । न लागो राजसा ।
हो रे वेडापिसा । माझ्यासाठी " ॥७॥

रस म्हणे आली । हाक माझ्या कानी ।
अर्पिला चरणी । देहभाव ॥८॥

◆ ◆

१९

संतांच्या संगती । खंत न वा खेद ।
मावळती भेद । भ्रममूल ॥१॥

संतांच्या संगती । सरते अहंता ।
जळतात चिंता । चितेसम ॥२॥

संतांच्या संगती । अखंड आनंद ।
नाचतो मुकुंद । प्रेमभरे ॥३॥

संतांच्या संगती । स्फूर्तीचे उधाण ।
भक्तिरसपान । अखंडित ॥४॥

संताच्या संगती । काल विसावला ।
देह विसरला । देहपण ॥५॥

संतांच्या संगती । हात जोडे मुक्ती ।
रस म्हणे शक्ती । शिवासह ॥६॥

◆ ◆

२०

जेथे पाहू तेथे । तुझेच रे राज्य ।
आनंदाची शेज । अंथरली ॥१॥

अवतीभवती । कोंदाटे आनंद ।
हृदयाचा कंद । सुखावला ॥२॥

गळाली अवघी । कर्तृत्वाची सीमा ।
गीताचा महिमा । पैसावला ॥३॥

रस म्हणे आता । नाचतो कौतुके ।
खेळतो भातुके । मुक्तपणे ॥४॥

## २१

गोपीचे हृदय । सुकुमार भाव ।
याची माझ्या हाव । अंतरास ॥१॥

नवनीतावाणी । सुमधुर वाणी ।
प्रीतिचीच खाणी । अंतरंग ॥२॥

पुरुषहृदय । परुष खरेच ।
निर्मिलेस तूच । होय ना रे ? ॥३॥

त्याच्याही हृदयी । वसे एक ' गोपी ' ।
तिजला संगोपी । तुझा तूच ॥४॥

रस म्हणे झालो । तेवढाच धन्य ।
बाकी सारे शून्य । मातीमोल ! ॥५॥

• •

लिहावे अभंग । भिजल्या तुक्याने!
अथवा नाम्याने । नाचणाऱ्या ॥१॥

हातात तराजू । डोळ्यांमाजी भूक ।
अभंगाचे सूख । थंडावले ॥२॥

रस म्हणे जिणे । वाहू पायतळी ।
अभंग—अंजुळी । तेव्हा खरी ॥३॥

◆ ◆

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 23603
22598
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# अनुवाद

## दशश्लोकी

१

न भूमी, न पाणी, न अग्नी, न वात
न आकाश, गात्रे, न वा तत्समूह
विनाशीच हे, गाढ झोपी असे जो
उरे एकला मी शिव द्वैतशून्य....

२

न वा वर्ण मी, आश्रमाचारधर्म
नसे धारणाध्यानयोगादि माते
दिले सोडुनी मी भ्रमा 'मी नि माझे'
उरे एकला मी शिव द्वैतशून्य ....

३

न माता पिता वा, न वा देव, लोक
न वा वेद वा यज्ञ वा तीर्थजात
सुषुप्तीतले ब्रह्म ते शून्यहीन
उरे एकला मी शिव द्वैतशून्य....

४

न मी सांख्य वा, शैव, वा पांचरात्र
न मी जैन, मीमांसकांचोहि तत्त्व
स्वतंत्रानुभूती जया शुध्दमात्र
उरे एकला मी शिव द्वैतशून्य....

५

वरी ना, न खाली न वान्तर्न बाह्य
न मध्ये, न तिर्यक न, पूर्वापरेला
नभा व्यापुनी जो अखंडैकरूप
उरे एकला मी शिव द्वैतशून्य....

६

न वा शुक्ल मी, कृष्ण वा रक्त पीत
न वा कुब्ज मी, पुष्ट वा ह्रस्व दीर्घ
नसे रूप ज्याते, असे ज्योतिमात्र
उरे एकला मी शिव द्वैतशून्य...

७

गुरू ना, न वा शास्त्र वा शिष्य शिक्षा
नसे 'तू' नि 'मी'ही नसे हा प्रपंच
स्वरूपास जाणे, विकल्पास नेणे
उरे एकला मी शिव द्वैतशून्य....

८

नसे जागृती, स्वप्न वा, वा सुषुप्ती
न वा विश्व मी, तैजस प्राज्ञ किंवा
अविद्यामयी ही त्रयी, जो तुरीय
उरे एकला मी शिव द्वैतशून्य....

९

निराळाच मी व्यापक, श्रेयरूप
स्वतःसिद्ध, अन्याश्रयावीण, साक्षी
जगत्तुच्छ हे, जो तयाहून भिन्न
उरे एकला मी शिव द्वैतशून्य....

१०

नसे एक, ज्यावीण नाही दुजे वा,
नसे केवली मी, नसे वा तदन्य
नसे शून्य वा मी, नसे वा अशून्य
कसे सांगु मी सर्ववेदांतसिद्ध ?

शंकराचार्य

◆ ◆

## तू राम स्मर

तू राम स्मर, जगा झुंजू दे ॥ ध्रु. ॥

चंडी भैरव शितळादेवी
दगड पुजत, त्या पूजू दे ॥१॥

हत्ती चाले आपल्या चाली
भुंकत कुत्रे भुंकू दे ॥२॥

कोरा कागद काळी शाई
लिहित वाचत, त्या वाचू दे ॥३॥

**कबीर** सांगे ऐक सज्जना
नरका जाते जाऊ दे ॥४॥

कबीर

## कोण दाखवी वाट ?

गुरुविण कोण दाखवी वाट ? ।
महाकाठिण यमघाट ॥ ध्रु. ॥

भ्रांतिपहाडी सरिता वाहत ।
अहंकार ही लाट ॥१॥

मदमत्सर हे मेघ वर्षत ।
मायापवन घनदाट ॥२॥

कामक्रोध हे दोन पर्वत ।
लोभचोर संगात ॥३॥

**कबीर** सांगे ऐक सज्जना ।
का करणे बोभाट ? ॥४॥

कबीर

## म्हणे कबीर

याचे मला हसू येते
जेव्हा असे ऐकू येते ।
" पाण्यातलीच मासोळी
तहानेने व्याकूळली ॥
घरात ना वस्तू दिसे
रानीवनी हिंडतसे ॥ "

इथे एक सत्य आहे
जोवरी न आत्मा पाहे ।
तोवरी हे जग स्वप्न
काशी-मथुरा व्यर्थ आहे ॥
म्हणे कबीर प्रभूचा
माझी वाणी खरी आहे ॥

कबीर

## तसा मुक्त कर

अज्ञात वाटांवर स्वैर भटकणारे
रानावनांतले पक्षी जसे मुक्त असतात
तसा मला मुक्त कर....

धो धो कोसळणारा
पाऊस जसा मुक्त असतो,
तसा मला मुक्त कर....

आपला जटाभार घुसळणारे
आणि अज्ञात लक्ष्याकडे
सैरभैर धावत सुटणारे
वादळ जसे मुक्त असते
तसा मला मुक्त कर....

रानात भडकलेला
वणवा जसा मुक्त असतो
तसा मला मुक्त कर....

अकटोविकट, कडकडणारे हास्य करणारी
अंधाराचा बेगुमान उपहास करणारी
घनगर्जना जशी मुक्त असते
तसा मला मुक्त कर....

रवीन्द्रनाथ

## कृपा

जगाच्या धुळीच्या रस्त्यात
मी आपले हृदय हरवून बसलो ;
पण तू ते अलगद
आपल्या हातात उचलून धरलेस....

सुखाच्या शोधात
मी दुःखच वेचत आलो ;
पण तू पाठवलेले तेच दुःख
आता माझ्या जीवनात
सुखरूप झाले आहे...

माझ्या वासनांचे
छिन्नभिन्न तुकडे होते ;
ते तू उचललेस,
आणि आपल्या प्रेमसूत्रात गुंफलेस....

मी दारोदार भणंग भटकत राहिलो
तरीही माझे प्रत्येक पाऊल
तुझ्या दाराकडेच मला नेत राहिले....

रवीन्द्रनाथ

◆ ◆

## सहयोग

तुला जागा करून देण्यासाठी
कुणालाच बाजूला सारावे लागत नाही.
जेव्हा हृदयातली प्रीत
तुझ्यासाठी आसन सज्ज करते
तेव्हा ती ते सर्वांसाठीच करीत असते.

जेव्हा पार्थिव राजाचे आगमन होते
तेव्हा पहारेकरी गर्दी हटवतात.
पण माझ्या राजा!
जेव्हा तू येतोस
तेव्हा सारे जगच तुझ्यासह येत असते.

रवीन्द्रनाथ

## तू माझा हात धर

माझ्या राजा ! माझ्याच सावल्यांपासून.
माझ्या जीवनातल्या संकटांपासून
आणि सभ्रमांपासून मला वाचव.
कारण रात्र अंधारी आहे,
आणि तुझा हा यात्रिक आंधळा आहे.
तू माझा हात धर.

निराशेतून मला सोडव.
तुझ्या दिव्य ज्योतीच्या स्पर्शाने
माझ्या दु:खाचा प्रकाशहीन दिवा लागू दे.
माझ्या सुप्त बळाला जाग आण.
मी काय गमावले याची मोजदाद करत
मागे रेंगाळणाऱ्या मला, रेंगाळू देऊ नकोस.

मी ज्या रस्त्यावरून जात आहे,
तो रस्ता पावलोपावली त्या खऱ्या घराची गाणी
माझ्या कानी गुणगुणू दे.

कारण रात्र अंधारी आहे,
आणि तुझा हा यात्रिक आंधळा आहे.
प्रभो ! तू माझा हात धर.

रवीन्द्रनाथ

**ऊठ ! अरे, जागा हो.**

हृदयात तुझ्या ग्लानी आहे ;
नि डोळ्यांत तुझ्या गुंगी आहे.
'फूल हसे काट्यांत बघ कसे !' —
ही वाणी तुझ्या कानांवर अजून आली नाही ?
ऊठ, जागा हो. रिकामा क्षण घालवू नको....

ही खडकाळ वाट जिथे संपते
तिथल्या निर्जन एकांतात
माझा सखा एकटाच वाट पाहत आहे.
त्याची वंचना करू नको.
ऊठ ! अरे, जागा हो....

भर दुपारच्या उन्हात
आकाश कधी धापा टाकते काय ?
त्याला कधी थरकाप सुटतो काय ?
तापलेली वाळू आपली तहानेची कंथा
कधी पसरते काय ?

तुझ्या हृदयाच्या खोल गुहेत
आनंदाचा उमाळा नाही ?
तुझ्या प्रत्येक पावलागणिक
ही पथवीणा वेदनेचे गोड सूर
काढीत नाही ?

ऊठ ! अरे, जागा हो....

रवीन्द्रनाथ

## महान सत्य मात्र

भांडयातले पाणी
स्वच्छ चकाकते
सागरातले पाणी
गाढ निळे दिसते.

लहान गोष्टी
शब्दांत बसतात
अगदी स्वच्छ, सरळ !
महान सत्य मात्र
मौनातच राहते.

रवीन्द्रनाथ

## महान चाले

महान चाले
लहानासंगे
निर्भयतेने.

मधले केवळ
दूर राहते
तटस्थतेने.

रवीन्द्रनाथ

◆ ◆

## जीवन जेव्हा शुष्क भासते

जीवन जेव्हा शुष्क भासते
करुणेचा वर्षाव करित ये
जीवनातला मधू आटता
गीतामृतरस आत ओत ये....

गर्जत गर्जत दिशास दाही
कर्म भयंकर प्रबळ घेरता
माझ्या शांतिमया परमेशा !
हृदयमंदिरी हलके ये ये....

दीनहीन मन अंग चोरुनी
पाय आखडुन झुरत राहता
प्रभो, उदारा ! दार उघडुनी
राजवैभवे तेथे ये ये...

प्रचंड उडावित धूळ वासना
दिपावित दृष्टी अंधच करिता
आत्मज्योती ! परम पावना ! !
उग्र तेज तव प्रकटत ये ये.... !

रवीन्द्रनाथ

## हीच प्रभो एक प्रार्थना

हीच प्रभो एक । प्रार्थना पायाशी ।
भंजवी मानसी । दैन्य माझे ॥१॥

सुखदुःखांचे गा । अनुभव माझे ।
सहाया ते ओझे । बळ देई ॥२॥

प्रेमाची माउली । सेवा प्रसवू दे ।
धैर्य मज दे दे । तयासाठी ॥३॥

दीनहीन आर्ता । क्षुद्र लेखणारे ।
मनाचे माजोरे । दूर करी ॥४॥

उद्धटांपुढती । वाकावया मान ।
–देवा तुझी आण– । नसो कधी ॥५॥

दिसादिसामाजी । मन:क्षोभ सान ।
त्यांजला रे मन । ओलांडू दे ॥६॥

सारे सारे माझे । तनमनधन ।
भक्तीत अर्पण । होवो तुझ्या ॥७॥

रवीन्द्रनाथ

◆ ◆

## आता तू आहेस

तुला मी प्रथम ओळखले
तेव्हा तुझे रूप असे काही गोड होते की
तुझ्याचरणी मी मिठीच घातली !
आता तू झाला आहेस निराकार
आणि आहेस लपलेला.

तुला मी प्रथम ओळखले
तेव्हा तू एक कळी होतास :
उमलण्याचे गोड आश्वासन देणारी;
आता तू उमलला आहेस :
उदात्त सुगंध होऊन.

तुला मी प्रथम ओळखले
तेव्हा तू होतास मानवांचे एक अमोल रत्न.
आता तू आहेस : एक झगमगणारी अंतर्ज्योत.

तुला मी प्रथम ओळखले
तेव्हा तुझे रहस्य होते एक अंडे :
आता तू फोडले आहेस ते कवच
आणि झाला आहेस जीवनाचे जीवन.

तुला मी प्रथम ओळखले
तेव्हा मला वाटले: तू आहेस दैवाच्या फेराचे कारण;
आता मी जाणतो की
तूच आहेस माझे एकमेव आश्रयस्थान.

तुला मी प्रथम ओळखले
तेव्हा तू होतास माझा वाटाड्या नि गुरू ;
आता मला कळते की
तू आहेस रहिवासी
माझ्या हृदयगुहेतला....

अरुणगिरिनाथर्

◆ ◆

## सैचीची* मुक्तिसूक्ते

१

बुद्धा !
जेव्हा मी तुझी पूजा करतो,
तेव्हा हा एक बुद्ध
दुसऱ्या बुध्दाची पूजा करतो.
हे सारे मला माहीत होते—
बुद्धा, तुझ्यामुळे !

( तुझ्या ) या प्रसादाबद्दल
सैची अत्यंत कृतज्ञ आहे.

---

* बौद्ध धर्मातील झेनपंथाचा साधू.

२

+ अमिदाशी
मी करतो देवाणघेवाण
आपल्या कामाची.
मी त्याची पूजा करतो ;
आणि तोही माझी पूजा करतो—
आपल्या परीनं खाली उतरून.
अशी चालते आमची
देवाणघेवाण कामाची.

---

+ बुद्ध ( Amida ), अमित, अनंत

३

मी आराम पडून आहे;
अमिद माझी पूजा करायला
खाली येत आहे.
मीही परत
अमिदाची पूजा करीत आहे–
" नेमु[1]–अमिद–बुत्सु ! "

---

१ 'नमः अपरिमिताय बुद्धाय ।' = अपार, अनंत अशा बुद्धाला नमस्कार ! हा सैचीचा गूढ, अनिर्वचनीय व प्रभावी नाममंत्र असून 'नमु = जीव' हा 'बुत्सु = बुद्ध' याच्याशी एकरूप आहे अशी प्रचीती त्याला त्यातून येते. तुलनार्थ – 'सोऽहम्'

४

एक बुद्ध
दुसऱ्या बुद्धाची
पूजा करीत आहे.
अमिद नमूची
पूजा करित आहे ;
हाच ' किम्यो ' चा अर्थ.
तो उमटला आहे
" नमु–अमिद–बुत्सु " मध्ये.

५

हा षडक्षरी मंत्र
दिला आहे मला ओयसमाने :
तो कितीही खर्च केला
तरी कधीच संपत नाही.
जितका तो जपावा
तितका तो अधिकच वाढत आहे ;
अत्यंत विलक्षण आहे
हा कोश !
आणि ही मंगल गोष्ट
मला मिळत आहे
या वरदानाने
किती सुखी,
किती कृतार्थ आहे मी !
" नमु-आमिद-बुत्सु ! "

---

२ बुद्ध. ओय म्ह. बुद्ध; आध्यात्मिक मातापिता

६

ओयसम जो मला
कधीच सोडत नाही–
आता मीच बनला आहे,
आणि ऐकवीत आहे मला
आपले नाम–
" नमु–अमिद–बुत्सु ! "

७

मी आहे
एक भाग्यवान माणूस :
मला लाभला आहे ओयसम,
तो करीत आहे माझे परिवर्तन
बुद्धामध्ये–
" नमु–अमिद–बुत्सु ! "

८

खरोखर, मी किती भाग्यवान !
मेल्यावर नव्हे,
तर याचि देही, याचि डोळा
मी जात आहे
त्या परंधामाकडे !
" नमु-अमिद-बुत्सु ! "

९

या लोकात
जगता जगताच
" नमु–अमिद–बुत्सु " मुळे
मी जात आहे
" नमु–अमिद–बुत्सु " कडे.

१०

" सैची !
" ओ ! हा पहा मी इथे आहे. "
" कुठे आहे
तुझा सांगाती? "
" अमिद–बुद्ध माझा सांगाती. "
" तू कुठे आहेस ? "
" अमिदात. "
" सैची ! "
" ओ. "

११

सैची ! कुठे आहे
तुझे ते परधाम ?
आहे इथेच.
हे जग आणि
ते परंधाम
यांत सीमारेषा आहेच कुठे ?
चर्मचक्षू हीच ती सीमारेषा.

१२

सैची, तुला
बुद्‌ध पहायचा असेल,
तर ' की[३] ' आणि '[४]हो '
' नमु-अमिद-बुत्सु ' म्हणून
जेथे एक होतात,
तेथे, तुझ्या हृदयात, पहा—
हाच सैचीचा ओयसम.

या कृपेने किती सुखी
आहे मी !
" नमु-अमिद-बुत्सु,
नमु-अमिद-बुत्सु. "

---

३ जीव ४ शिव; बुद्ध.

१३

खरोखर मी किती
कृतार्थ मनुष्य आहे !
हव्या तितक्या वेळा
मी त्या परंधामाला
भेट देतो.
मी तिथे आणि परत इथे,
मी तिथे आणि परत इथे,
मी तिथे आणि परत इथे.
" नमु–अमिद-बुत्सु !
नमु-अमिद-बुत्सु ! "

१४

अमिद अमिदाला
हाकारीत आहे.
ती हाक–
" नमु-अमिद-बुत्सु,
नमु-अमिद-बुत्सु ! "

१५

मला जाऊ दे
त्या परंधामाकडे ;
तिकडे जाणे म्हणजे
शेजाऱ्यांच्या घरी
जाण्यासारखेच आहे.
हे जग म्हणजेच
ते परंधाम आहे.
" नमु–अमिद–बुत्सु ! "

१६

हा इहलोक
आहे परंधामाचे
छोटसे अंगण ;
त्या अंगणाकडे
पाहता पाहता
मी लुटत आहे
परंधामाचा आनंद.
" नमु–अमिद–बुत्सु ! "

१७

ओय आहे परंधामात
मी आहे या जगात ;
आणि ओयनं
स्वत:त सामावून घेतलय् मला.
" नमु–अमिद–बुत्सु ! "

१८

सैची ! तुला कोण
काम करायला लावतं ?
मी काम करतो
" नमु–अमिद–बुत्सु" मुळं.

" नमु–अमिद–बुत्सु !
" नमु–अमिद–बुत्सु ! "

१९

किती कृतज्ञता वाटते मला !
मी जे जे या जगात करतो—
पोटाची खळगी भरण्यासाठी—
ते ते सारे परिवर्तित होत आहे
परंधामाच्या निर्मितीमधे....

२०

या जगात
मी काम करतो
साऱ्या बुद्धांच्या संगतीत.
या जगात
मी काम करतो
साऱ्या बोधिसत्त्वांच्या संगतीत.
ओयस्नमामुळे सुरक्षित आहे
मी इथे.

## २१

" सैची ! नायरॉइ–सन कोण आहे ? "

" तो माझ्याहून वेगळा नाही. "

" [ शिन धर्मपंथाच्या उपदेशाचा ] संस्थापक कोण ? "

" तो माझ्याहून वेगळा नाही. "

" [ त्याचा ] धर्मग्रंथ कोणता ? "

" तो माझ्याहून वेगळा नाही. "

पामराच्या हृदयाचे मूळ
स्थिर नसते,
तरीही तो मूलहीन ' हो ' मध्ये
रस घेतो ;
कारण त्याला दिलेले असते हृदय ओयाचे—
ते हृदय म्हणजे—
" नमु–अमिद–बुत्सु. "

---

९ बुद्ध; तथागत

## २२

नायराईचे वंद्य रूप
खरोखर
या नतद्रष्ट जीवाचेही रूप आहे.
" नमु-अमिद-बुत्सु,
" नमु-अमिद-बुत्सु ! "

## २३

किती छान !
सारे जग आणि आकाशाचा विस्तार
हाच बुद्ध !
आणि मी त्यातच.
" नमु-अमिद-बुत्सु ! "

२४

केवढे आश्चर्य !
" नमु-अमिद-बुत्सु " ने
भरून टाकले आहे
अवघे जग !
आणि हे जग
मला दिले आले
ओयसमाने !

हाच माझा आनंद !
" नमु-अमिद-बुत्सु ! "

२५

( खरा ) पुनर्जन्म म्हणजे
हा वर्तमान क्षण ;
तो मिळतो
" नमु-अमिद-बुत्सु " मुळे.
" नमु-अमिद-बुत्सु ! "

२६

सर्वांत आश्चर्य म्हणजे
बुद्धाचे अदृश्य करुणामय हृदय
दृग्गोचर होत आहे–
मला अगदी इथेच ;
लक्ष लक्ष भुवने
दूर असलेले
ते परंधाम
अगदी माझ्या इथे आहे–
“ नमु-आमिद्-बुत्सु ! ”

२७

जर हा लोक असता वेगळा
त्या परंधामाहून,
तर मी कधीच
ऐकला नसता ‘ धर्म ’ :
मी आणि इहलोक
हे परंधाम व अमिद–
सारे काही एक–
“ नमु-अमिद-बुत्सु. ”

२८

किती भयानक !
हा इहलोक असा आहे की,
आपली विविध कर्मे
अनंत काळपर्यंत
आपणाला करावी लागतात.

किती धन्य !
हे सारे
परिवर्तित होत आहे
परंधामाच्या ( दिव्य कर्मात )
अविरतपणे !

२९

' होक्काँइ 'चे सारे बुद्ध
घोषणा करतात की—
' आम्ही या सैचीला
बुद्ध करीत आहोत ! '—
" नमु-अमिद-बुत्सु,
  नमु-अमिद-बुत्सु. "

केवढा माझा आनंद !
किती  विचारातीत !
मी आणि अमिद
आणि ते " नमु-अमिद-बुत्सु. "

---

६ धर्मधातु ( universe as the totality of all things )= विश्व ( पूर्णत्व )

३०

" सँची, तुझा आनंद
कशात आहे ? "
" हे मायेचे जग
हाच माझा आनंद ;
कारण तेच बनते बीज
' हो' च्या आनंदाचे. "
" नमु-अमिद-बुत्सु,
" नमु-अमिद-बुत्सु ! "

३१

हे जग आणि परंधाम—
दोन्ही एकच ;
अणूसारखे असंख्य लोकही
माझेच.
" नमु-अमिद-बुत्सु,
नमु-अमिद-बुत्सु ! "

## ३२

परमानंद-धामाकडे
इथून नेणारा रस्ता
म्हणजे हा लोकच !
दुसरा नाही.
हा लोक म्हणजे
" नमु–अमिद–बुत्सु !"
जसा परमानंदलोकही
" नमु-अमिद-बुत्सु "च.

## ३३

किती धन्य !
किती धन्य आहे मी !
हा सैचीचा चर्मचक्षू
ही आहे सीमारेषा
( या लोकाची आणि परंधामलोकाची ).
" नमु-अमिद-बुत्सु ,
" नमु-अमिद-बुत्सु. "

३४

तू कुठे
झोपला आहेस, सैची ?
मी झोपलो आहे
या लोकाच्या परंधामात.
मी जागा झालो
म्हणजे जातो
अमिदाच्या परंधामात.

३५

सैची, मी फारच भाग्यवान आहे!
साऱ्याच प्रकारच्या दुःखांपासून
मी विमुक्त झालो आहे.
जगातल्या कसल्याच गोष्टीचे
मला दुःख नाही.
आता मला
" नमु-अमिद-बुत्सु " ही
जपावा लागत नाही!

तुझ्या कृपेची आहे
माझ्यावर पाखर. [ अमिद-सन ! ]
तुझ्या या कृपेने
मी किती तृप्त आहे !
" नमु-अमिद-बुत्सु ! "

मराठी ग्रंथ संग्रहालय
2303
वा. क्र. 22498
शाखा

३६

या गिरिपथावरून चालता चालता
चिलीम ओढताना
काय मजा वाटते !

रस्त्याच्या कडेला
मी थोडावेळ बसतो,
शांतपणे चिलीम बाहेर काढतो
आणि मनावर
कसल्यास दु:खाचे ढग येत नाहीत.

पण आता आपण घरी जाऊ या.
घराकडे पावले टाकताना
किती हलकी वाटतात ती मला !
माझ्यात विचार दाटून राहिले आहेत
अमिदाच्या प्रांतात परतीची यात्रा करण्याचे.
“ नमु-अमिद-बुत्सु ”
“ नमु-अमिद-बुत्सु ! ”

३७

किती सुखी आहे मी !
" नमु-अमिद-बुत्सु ! "
मी परंधाम आहे,
मी ओयसम आहे.
" नमु–आमिद्–बुत्सु !
  नमु–अमिद्-बुत्सु ! "

३८

वैभवाने तळपणारे
बुद्धाचे परंधाम
आणि हे माझे परंधाम.
" नमु-अमिद-बुत्सु !
  नमु–अमिद–बुत्सु ! "

## ३९

मला माहीत आहेत पुष्कळ
माझ्या आधी या वाटेने गेलेले.
" नमु-अमिद्-बुत्सु " त
मी विहार करतो आहे.

किती सुखी आहे
मी या प्रसादाने !
" नमु-अमिद-बुत्सु ! "

## ४०

' तुम्ही ' नेम्बुत्सु ' जपत नाही,
' नेम्बुत्सु ' तुम्हांला
जपायला लावतो;
आणि तुम्हांला
परंधामात नेतो.
" नमु-अमिद-बुत्सु ! "

---

७ बुद्धाचे चिंतन; नामस्मरण

## ४१

८४,००० इतक्या माझ्या
दुष्ट वासना होत्या;
आता कुठलीच
माझ्यात नाही.
साऱ्या हिरावून घेतल्या घेतल्या आहेत
" नमु–अमिद–बुत्सु ! " ने

## ४२

सैची, सारे काही
तुझ्यापासून
हिरावून घेतले आहे.
आणि ' नेम्बुत्सु ' दिले आहे–
" नमु–अमिद– बुत्सु ! "

४३

सैचीजवळ आता
काही नाही—
हाच आनंद आहे.
या पलीकडे
काहीच नाही. सत् आणि असत् दोन्हीही-
सारे काही हिरावून घेतले आहे,
काहीच उरले नाही.

काहीच जवळ नसणे-
हीच मुक्ती, हीच शांती.
" नमु-अमिद-बुत्सु " ने
सारे काही हिरावून घेतले आहे.
हीच खरी शांती आहे.
" नमु-अमिद-बुत्सु ! "

## ४४

मी आहे गरीब;
आणि त्यातच आहे
माझे अपरंपार समाधान;
अमिताच्या परंधामाचा
मी घेत आहे आस्वाद
इथेच.
" नमु-अमिद-बुत्सु ! "

## ४५

" किती दुष्ट ( मी ) ! "
हे सहजच स्फुरते.
बुद्धाच्या कृपेने
" किती कृतज्ञ ( मी ) ! "
हेही सहजच स्फुरते.
' की ' आणि ' हो '
दोन्ही ओयाचीच निर्मिती :

सारे काही
पूर्णातच विराम पावते.

४६

" सारेच घेतले हिरावून
काहीच उरले नाही–
याचा अर्थ काय ? "
" त्याचा अर्थ
सर्व काही लुटले ! "
" केवढे हे ऋण ! "
" नमु-अमिद-बुत्सु ! "

४७

मी काहीच करीत नाही
मी काहीच करीत नाही.
नायोराइ-सन मला नेत आहे
आपल्याबरोबर !
मी अत्यंत सुखी आहे !

४८

माझ्या साऱ्या वासना
हिरावून घेतल्या आहेत;
आता " नमु-अमिद-बुत्सु "
माझे सर्वस्व आहे.

४९

असेच चालो
जग हे पुढती
अज्ञानाची
अवघी कर्जे
इथेच फिटती–
नायराइसनच्या
कृपाकटाक्षे.
किती सुखी मी !
किती सुखी मी ! !

५०

" सैची ! तू तर असा;
मग अमिदाबद्दल तुला
कृतज्ञ—भाव नाही काय ? "
" मला कसलाच नाही
विशिष्ट भाव;
तरीही मी ऐकतो
बरीच प्रवचने;
आणि कारण म्हणाल
तर काहीच नाही. "

५१

अगदी अलिप्त
आहे मी !
आनंद नाही, नि
कृतज्ञताही नाही !
तरीही तिच्या अभावी
कसलेच दुःख नाही.

## ५२

मृत्यू –
मृत्यूहून सुंदर काहीच नाही;
किती मोकळे वाटते माणसाला !
या मोकळेपणाला
तोड नाही.

" नमु-अमिद-बुत्सु,
नमु-अमिद-बुत्सु ! "

## ५३

" सैची, तू म्हणतोस
' मला दिले आहे,
मला दिले आहे; '
तर तुला काय दिले आहे? "
" होय, होय, मला दिले आहे
अमिदाचे नाम!
आणि ते विनामूल्य!
त्यामुळे सैची
निवांत झाला आहे.
हे निवांत होणे म्हणजे
' की ' ला ( ओयसमाने )
पूर्णपणे आत्मसात करणे.
खरोखर ओयसमाने
घेतला आहे माझा पूर्ण ताबा
आणि हा माझा ओयसम म्हणजे
" नमु-अमिद-बुत्सु! "

५४

(बुद्धाचे) स्मरण करते
ते हृदय असते बुद्धाचेच.
बुद्ध बुद्धाला
प्रदान करीत असतो—
" नमु—अमिद—बुत्सु ! "

५५

मी सुखी आहे;
आनंदी हृदय
आहे मला दिलेले;
अमिदाचा आनंद
हाच माझा आनंद—
" नमु—अमिद—बुत्सु ! "

५६

असुर आले आहेत ?
सर्प आले आहेत ?
मला माहीत नाही.
ओयसमाने
आपल्या बाहुपाशात घेऊन
आलिंगिले आहे
माझे जीवन.
ओयसमाच्या मुखाकडे
पाहत पाहत
मी पीत आहे
" नमु-अमिद्-बुत्सु ! "
आणि होत आहे पुष्ट.
" नमु-अमिद्-बुत्सु ! "

५७

माझे हृदय
नि तुझे हृदय–
दोन्ही हृदयांची एकता–
" नमु–अमिद–बुत्सु ! "

५८

हे आनंदधाम आहे माझे;
" नमु–अमिद–बुत्सु" जेव्हा ऐकता
तेव्हा ते ध्या म्हणजे झाले.

५९

किती कृतज्ञ आहे मी !
काहीच न जाणता
जगत आहे मी–
हे जगणे
सहज परंधाम
आहे ना ?

## ६०

" सैची, तू ' स्वतःला '
कसा पाहतोस ? "
' स्वतःला ' पाहायला
अमिदाचा आरसा घ्यावा लागतो.
त्यात प्रतिबिंब पडते
' की ' आणि ' हो ' चे.
त्या पलीकडे-पश्चात्ताप आणि आनंद.
किती अद्भुत ! किती अद्भुत ! !
खरंच, अत्यंत कृतज्ञ आहे मी !
" नमु-आमिद्-बुत्सु. "

## ६१

साऱ्याचा शेवट
होतो पूर्णतेत.
किती कृतज्ञ
आहे मी
या कृपेबद्दल !
आणि माझे ( म्हणाल तर )
त्यात काहीच नसते.
किती कृतज्ञ आहे मी
या प्रसादाबद्दल !

६२

सैचीने आतापर्यंत
कधी परंधाम
पाहिले आहे काय ?
नाही, सैचीने कधीच
पूर्वी ते नाही पाहिले.
हे छान आहे–
ही त्याची पहिलीच भेट आहे.

६३

किती धन्य आहे मी
या कृपेबद्दल !
" नमु-अमिद-बुत्सु ! "
आता मला माहीत आहे
कुठे ठेवावे
माझ्या साऱ्या भ्रमांचे गाठोडे :
ते ( ठिकाण ) म्हणजे
जेथे एक होतात
' की ' आणि ' हो '—
" नमु-अमिद-बुत्सु. "

६४

किती दुष्ट ( आहे मी ) !
मी काय करू ?
( पण ) दुष्टता हीच आहे
" नमु-अमिद-बुत्सु "–
" नमु-आमिद-बुत्सु ,
नमु-अमिद-बुत्सु ! "

६५

' होक्काइ ' त
दुसरे काहीच नाही;
केवळ एकच आहे तेथे–
ते म्हणजे–
" नमु–अमिद–बुत्सु "
आणि हीच सैचीची
दौलत आहे.

६६

किती दुष्ट !
किती आनंदी !
दोन्हीही एक
" नमु-अमिद-बुत्सु ! " त

६७

" नमु-अमिद्-बुत्सु ! " चे
होते रूपांतर
आणि ते होतो मी ,
ते रमते माझ्यात
आणि मी रमतो त्यात.

६८

' नमु ' म्हणजे मी,
अमिद् म्हणजे ' नमु ';
आणि दोघे ' नमु ' आणि अमिद्
आहेत " नमु–अमिद्–बुत्सु. "

६९

मरणाकडे वाटचाल करणारा मी
आता झालो आहे अमर—
" नमु-अमिद्-बुत्सु ! " मुळे.

७०

जीवनाची परिणती
म्हणजे अमरत्व;
अमरत्व
हा जीवनाचा अंत.
( हा ) जीवनाचा अंत
म्हणजे-" नमु-अमिद-बुत्सु " होणे.

७१

हिरावून नेले आहे
मृत्यूला
माझ्यापासून,
आणि त्याजागी
अवतरले आहे-
" नमु-अमिद- बुत्सु ! "

७२

जीवन संपुष्टात आल्यावर
मरणाप्रत जाणारे
सैघीचे हृदय
आता अमर बनले आहे.
ते झाले आहे–
" नमु-अमिद्-बुत्सु. "

७३

नमु–सन आणि अमिदसन–
दोघेही आहेत अमिद :
" नमु-अमिद्-बुत्सु ! "
हा आनंद
हाच माझा आनंद.

७४

" नमु-सन आणि अमिदसन
संभाषण करतात :
ओय आणि त्याचा पुत्र
यांचे हे
" नमु-अमिद-बुत्सु ! " आहे.

७५

" नमु-अमिद्-बुत्सु " बद्दल
सैचीची काय समजूत आहे ?
होय, मी आहे दत्तकपुत्र
" नमु–अमिद्–बुत्सु ! " चा

कृतज्ञ जीवनाबद्दल
तुला काय वाटते ?
कृतज्ञतेबद्दल म्हणाल तर,
कधी मला ती वाटते
कधी वाटत नाही.

खरोखर, मी एक
दुष्ट माणूस आहे !

७६

कोठून येते
" नमु-आमिद्-बुत्सु " ?
ओयाच्या हृदयातून
पाझरणारी आहे ती करुणा;
किती धन्य आहे मी
या "नमु-अमिद्-बुत्सु" च्या कृपेने !

७७

" सैची, तू कुठे  जाणार? "
" सैची परंधामाला जाणार."
" कुणाबरोबर? "
" ओयसमबरोबर –
किती आनंदात आहे मी! "
" नमु-अमिद-बुत्सु,
" नमु-अमिद-बुत्सु! "

७८

त्या परंधामाबद्दल
मी खूप ऐकले होते,
पण शेवटी ते तसे (अपेक्षेप्रमाणे)
मुळीच नसते ;
खरोखर ते तसे नसते ,
हेच छान आहे ;
त्यामुळे मला किती
घरच्यासारखे ( स्व-स्थ ) वाटते !
" नमु-अमिद-बुत्सु,
" नमु-अमिद-बुत्सु! "

७९

मी अगदी उदासीन आहे !
आनंद नाही,
कृतज्ञता नाही,
आणि तरीही
कृतज्ञतेच्या अभावी दु:ख नाही.

८०

' नेम्बुत्सु ' असते
आकाशाच्या विस्तारासारखे;
आकाशाचा विस्तार
असतो प्रकाशित झालेला–
ओयसमाच्या ' नेम्बुत्सु ' ने.
माझे हृदय प्रकाशले आहे
ओयसमाने.
" नमु-अमिद-बुत्सु ! "

## ८१

सैचीचे मन
(पाण्यातल्या)भोपळ्यासारखे असते;
नेहमीच ते तरंगते ;
वाऱ्यांनी वाहिलेले
तरंगत तरंगत
ते वाहत जाते—
अमिदाच्या पवित्र धामाकडे.

## ८२

कसे कुणास ठाऊक,
कसे कुणास ठाऊक—
हाच माझा आधार;
कसे कुणास ठाऊक
हा " नमु-अमिद-बुत्सु. "

८३

अमिद म्हणजे
" हा पहा मी इथे आहे ! "
नमु आणि अमिद–
यांचे बनले आहे
" नमु-अमिद-बुत्सु ! "
नायराई–सन,
हे असले मी लिहितो.
किती सुखी ( आहे मी ) !

८४

सैची असा असल्याने
त्याच्या बाबतीत
काही तरी अद्भुत घडले आहे–
त्याच्या त्या हृदयाचे
परिवर्तन झाले आहे
बुद्धत्वात !
केवढी विलक्षण गोष्ट ही !
" नमु-अमिद-बुत्सु ! " —
त्यात किती कल्पनातीत
गोष्टी आहेत !

८५

होनेन शोनिन हा
‘ नेम्बुत्सु ’ दिवसातून साठ हजार वेळा
जपत असे म्हणे;
सैची अधून मधून
तो जपतो.
साठ हजार वेळा आणि अधून मधून—
दोन्ही एकच आहेत.
किती कृतज्ञ आहे मी
या कृपेबद्दल !
“ नमु-अमिद-बुत्सु ! ”

८६

आपल्या असंख्य जन्मांतल्या
साधनेने मिळालेले
अमिदाचे सारे पुण्य
‘ सैची ’ नावाच्या
या देहात
भरून राहिले आहे.
हे पुण्य म्हणजे
दुसरे काही नसून
हा षडक्षरी मंत्र—
“ न-मु-अ-मि-द-बुत्सु. ”

८७

" नमु-अमिद-बुत्सु " अक्षय्य आहे,
कितीदा जरी तो जपला, तरी तो अक्षय्य आहे.
सैचीचे हृदय अक्षय्य आहे ;
ओयाचे हृदय अक्षय्य आहे.
ओयाचे हृदय नि सैचीचे हृदय
' की ' आणि ' हो '
दोहोंचा देह एकच ,
तो म्हणजे—
" नमु-अमिद-बुत्सु. "
कितीदा जरी जपला
तरी तो अक्षय्य आहे.

८८

" नायराइसन, माझ्यासारख्या दुष्टाचा
तू स्वीकार करशील का ? "
" हे निश्चित की ,
तुझ्यासारख्या दुष्टांचे
अस्तित्व आहे म्हणूनच
ओयसमाच्या कृपेची जरुरी आहे.
सैची ,
ते नाम तुझ्यासाठीच आहे ,
आणि ते तुझेच आहे. "
" अगदी खरं आहे ,
खरंच मी ऋणी आहे ,
मी ऋणी आहे या कृपेबद्दल--
" नमु-अमिद-बुत्सु ! "

८९

" सैची तुला ' नेम्बुत्सु ' आठवते
तेव्हाच तू ते जपतोस काय ?
जेव्हा तुला ते आठवत नाही
तेव्हा तू काय करतोस ? "
" असं पहा ,
जेव्हा मी त्याला स्मरत नाही
तेव्हा ' नमु-अमिद-बुत्सु' ( अगदी तेच ) असते
' की ' आणि ' हो ' यांचे एकत्व ;
माझे ( नेम्बुत्सूचे ) स्मरणही
त्यातूनच अंकुरते.
किती कृतज्ञ आहे मी
या कृपेबद्दल ! "
" नमु-अमिद-बुत्स,
" नमु-अमिद-बुत्सु ! "

९०

" नमु—अमिद—बुत्सु ! आहे
सूर्य-देवासारखे ,
या विश्वासारखे ,
या विशाल धरतीसारखे ,
या समुद्रासारखे !

सैचीचे हृदय कसे का असेना !
त्याला व्यापले आहे
आकाशाच्या पाकळीने ,
आणि आकाशाच्या पोकळीला
व्यापले आहे " नमु—अमिद-बुत्सु ! " ने.

माझ्या सुहृदांनो ,
कृपा करून " नमु-अमिद-बुत्सु ! " ऐका.
" नमु-अमिद-बुत्सु "
तुम्हांला नरकातून सोडवील.

## ९१

कशातच गुंतायला नको :
' की ' त गुंतायला नको ,
' हो ' त गुंतायला नको —
हा धर्माचा आदेश आहे.
" नमु-अमिद्-बुत्सु ! "
ते ' की ' त आहे ,
' हो ' त आहे.
किती कृतज्ञ आहे मी !
" नमु-अमिद्-बुत्सु ! "

## ९२

" नमु-अमिद्-बुत्सु "
हे एक अद्भुत नाम आहे.
आणि ते मला मिळाले आहे
भेट म्हणून :
सैचीच्या हृदयातून
ते सहजच बाहेर येते ;
जसे असावे
तसेच हे आहे :
' की ' आणि ' हो ' ,
" नमु-अमिद्-बुत्सु त "
एक होतात.

## ९३

" सैची, ' नमु-अमिद-बुत्सु ' तला रस
आहे तरी कसा ते सांग आम्हांला.
' नमु-अमिद-बुत्सु ' ची चव
आहे तरी कशी ते सांग ना आम्हांला."
" 'नमु-अमिद-बुत्सु' लाच रस असा आहे :
हृदय भरून टाकणारा आनंद,
पोटभर आनंद,
जशी काही सागराची
गरगरणारी भरती—
अनिर्वाच्य—
केवळ एकच उद्गार : " ओहो ! "

९४

'^८बाँबू' राहू शकत नाही
बुद्धाबरोबर,
कारण त्याच्याजवळ नसते
नम्रता आणि तृप्ती ;
बुद्धाबरोबर राहते—
" नमु—अमिद—बुत्सु !"

---

८ मूढ, बुद्ध नसलेला.

९५

दुष्टपणा माझ्यात नसता,
तर मी मूर्तिमंत दुष्टता झालो असतो;
मला दुष्टपणा दिला आहे
हे केवढे माझे भाग्य !
" नमु-आमिद्-बुत्सु. '
नमु-अमिद्-बुत्सु ! "

९६

' बाँबु ' समजून घेतला नाही
तर तो दुष्टपणा असतो ;
समजून घेतला, तर
ती असते नम्रता—
" नमु-अमिद्-बुत्सु ! "

९७

सैचीच्या दुष्टाव्याला
ना अंत, ना पार ;
सैचीच्या सुष्टतेला
ना अंत, ना पार :
किती कृतार्थ वाटते मला
या वरदानाने !
" नमु-अमिद्-बुत्सु ! "

## ९८

" सैची, तुझे ज्ञान मला दे "
" हो, हो, देईन. "
" केवढे हे दुःख, केवढे हे दुःख !
" नमु-अमिद-बुत्सु ! "
" सैची, एवढेच ते ?
छे ! छे ! एवढे मुळीच पुरणार नाही. "
" होय, होय, एवढे पुरेल, एवढे पुरेल.
सैचीच्या ज्ञानाप्रमाणे
' की ' आणि ' हो ' आहेत एक :
"नमु-अमिद-बुत्सु ! "म्हणजे तेच.(तो स्वत.)
हे खरोखर सैचीचे ज्ञान.
त्याच्या दोन्ही हातात
आहेत फुले,
एकातून ती घेतली जातात
आणि दुसऱ्याला ती दिली जातात
भेट म्हणून. "

९९

असला हा बुद्ध !
खरोखर तो अप्रतिम बुद्ध !
जेथे जातो तेथे
तो माझा होतो सांगाती,
आणि धरतो माझे हृदय.
षडक्षरी ही पवित्र वाणी
ऐकली जाते
' की ' आणि ' हो ' चे अद्वैत म्हणून—
" नमु—अमिद—बुत्सु ! " अशी.
आपुलिया बळे नाही बोलवत ;
किती गोड गोड कृपा त्याची !

१००

सैचीला जाणवतो स्वत:त
मोहाचा अनंत प्रवाह ,
लोभाचा अनंत प्रवाह ;
(त्याच्यात) पेटला आहे सतत
आगीचा वणवा–
हा दाह
हे सैचीतले दुष्ट पिशाच्च आहे
यात आश्चर्य नाही.

१०१

सैचीचे हृदय
हा सारा पाऊस आहे,
सैचीचे हृदय
संततधार पावसाप्रमाणे
सारा पाऊस आहे ;
सैचीचे हृदय
सारे धुके आहे–
धुक्यातल्या धुक्यासारखे.
सैचीच्या हृदयात
दुष्टतेशिवाय
दुसरे काहीच नाही.

१०२

" किती दुष्ट मी ! "
– असे आपण सारे म्हणतो
अवमानित झालो म्हणजे.
पण आता आम्ही म्हणतो की,
असला अवमान हे एक असत्य आहे.
परंधामाला भेट दिल्यावर
आम्ही जे म्हणतो
ते खरे सत्य असते.

सैचीचा हा अवमान
हे आहे
केवळ एक असत्य,
भयानक असत्य, अत्यंत भयानक असत्य !
आणि या असत्यात
दुसरे एक असत्य
खोल गुरफटलेले आहे !
किती शरमेची गोष्ट !

" किती शरमेची गोष्ट ! " हेही एक
असत्य आहे ,
त्याच्या तोंडातून बाहेर पडलेले.
मुखवटा घातलेला हा सैची
अनादराने खेळत आहे
( आपल्या ) संत सद्गुरूंशी !

किती नतद्रष्ट ! किती नतद्रष्ट !
—इथे, इथेही त्या त्या सैचीने
पुन्हा घातला आहे मुखवटा !
मुखवटा घालून
प्रत्येकाला फसवीत
चहूकडे फिरण्याखेरीज
सैचीत दुसरे काही नाही ;
किती नतद्रष्ट !
सैची जे जे बोलतो
ती केवळ नतद्रष्टता आहे.
—हे सुद्धा असत्य ओठांचेच उद्गार.

एकच खरे सत्य म्हणजे
ओयसम,
त्याखेरीज दुसरे काही नाही !
माझी सारी असत्ये
त्याने पुरती हिरावून नेली आहेत,
( आणि उरले आहे केवळ )
" नमु-अमिद-बुत्सु ! "

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2323 ३०४४
वा. क्र. 22498
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0022514
REFBK-0022514

१०३

ज्यांना दु:खे असतात
त्यांना ज्ञान होते;
पण ज्यांना ती नसतात
त्यांना कधीच ज्ञान असणार नाही :
( दु:खाच्या ) हुंदक्याइतके
काहीच नसते जीवघेणे—
आणि ते हुंदके असतात अटळ.
पण अमिद् त्यांना नष्ट करतो,
आणि आता मी एवढेच म्हणतो
" नमु-अमिद्-वुरसु ! "

◆ ◆

ॐ तत्सत्

सोऽहं हंसः